रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक ११७
www.ramprahar.com
सोमवार, १३ नोव्हेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

महापारेषणमध्ये सायबर सुरक्षा जागृती अभियान/२
खासदार श्रीकांत शिंदेंनी केली इर्शाळवाडीत दिवाळी साजरी/५
जलतरणपटू आर्यन मोडखरकर याची राष्ट्रीय स्तरावर निवड/८

## मनोज जरांगे-पाटील यांना रुग्णालयातून डिस्चार्ज



**छत्रपती संभाजीनगर :** मराठा आरक्षणासाठी उपोषणास बसलेले मनोज जरांगे-पाटील यांना प्रकृती खालावल्याने उपोषणस्थळावरुन थेट रुग्णालयात नेण्यात आले होते. २ नोव्हेंबरपासून छत्रपती संभाजीनगरातील खासगी रुग्णालयात उपचार घेतलेले जरांगे-पाटील यांना रविवारी (दि. १२) दिवाळीदिनीच सुट्टी देण्यात आली. मागील दहा दिवस केलेल्या उपचारानंतर त्यांचे वजन आठ किलो वाढले. यामुळे त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्याचे डॉक्टरांनी सांगितले. रुग्णालयातून बाहेर येताच मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी फटक्यांची आतषबाजी करीत आणि घोषणा देत जरांगे-पाटील यांचे स्वागत केले. दरम्यान, जरांगे-पाटील यांनी रुग्णालयातून डिस्चार्ज घेतल्यानंतर घरी न जाण्याचा निर्णय घेतला होता. त्यावर ते ठाम आहेत. त्यानुसार ते अंतरवाली सराटी येथे जाऊन पुढील दौऱ्यासंदर्भात समर्थकांशी चर्चा करणार आहेत.

# सीमेवर तैनात जवानांमुळेच देश सुरक्षित -पंतप्रधान मोदी; जवानांसोबत साजरी केली दिवाळी

**शिमला : वृत्तसंस्था**

संपूर्ण देशभरात दिवाळी मोठ्या उत्साहात साजरी केली जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि. १२) देशवासीयांना दीपोत्सवाच्या शुभेच्छा दिल्यानंतर हिमाचल प्रदेश येथील लेपचा येथे जाऊन जवानांसोबत दिवाळी साजरी केली. या वेळी बोलताना त्यांनी सीमेवर तैनात असलेल्या जवानांमुळेच आपला देश सुरक्षित आहे, असे उद्गार काढले.

दिवाळी साजरी करण्याचा असा अनुभव समाधान आणि आनंदाने भरून पावणारा आहे. दीपावलीचा नवा प्रकाश तुमच्यासह संपूर्ण देशवासीयांपर्यंत पोहचेल, असा मला विश्वास आहे. सीमेवर तैनात असलेले जवान कोणत्याही आव्हानात्मक परिस्थितीला सामोरे जातात. भारतीय सैनिक हिमालयाप्रमाणे सीमेवर जोपर्यंत



उभे आहेत तोपर्यंत भारत सुरक्षित आहे. जवानांनी केलेल्या या सेवेमुळेच भारतीय भूमी सुरक्षित आणि समृद्धीच्या मार्गावर पुढे जात आहे, असे पंतप्रधान मोदी यांनी या वेळी नमूद केले.

गेल्या काही काळापासून भारताला जे यश मिळतेय त्याचे श्रेय सीमेवरील सैनिकांना आहे. सीमेवरील सैनिकांमुळे देश विकसित होण्याचे अधिकाधिक प्रयत्न केले जात आहेत. जिथे माझे सैनिक बांधव उभे आहेत ती भूमी एखाद्या मंदिरापेक्षा कमी नाही. जिथे जवान उभे आहेत तिथेच माझा उत्सव आहे, असे सांगून सीमेवरील सैनिकांना कुटुंबाची आठवण येणे स्वाभाविक आहे, पण तुमच्या चेहऱ्यावर ती उदासीनता दिसत नाही. तुम्ही उत्साहाने परिपूर्ण आहात, कारण देशातील १४० कोटी जनतेला तुम्ही तुमचे कुटुंब मानता. यासाठी देश तुमचा सदैव ऋणी राहील, असे पंतप्रधान मोदींनी सांगितले. आता संकल्पही आमचे असतील, संसाधनेही आमची असतील, आता धैर्य-शौर्यही आमचे असेल, शस्त्रेही आमची असतील. आता श्वास आणि विश्वासही आमचा असेल, प्रत्येक पाऊल आमचे असेल. खेळही आमचा असेल आणि विजयही आमचाच होईल. उंच पर्वत असो वा वाळवंट, विस्तीर्ण मैदाने असोत, आकाशात फडकणारा हा तिरंगा सदैव आमचा असेल, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला.

# आगामी निवडणुकांमध्ये विजयी परंपरा कायम राखण्यासाठी सतत कार्यरत राहा

### मंत्री रवींद्र चव्हाण यांचे प्रतिपादन ■ भाजपच्या नवनिर्वाचित सरपंच व सदस्यांचा सत्कार




(छाया : योगेश पाटील)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच राज्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपला मोठी ताकद दिली आहे. आता आपल्याला २०२४मधील महाविजयाच्या दिशेने वाटचाल करायची आहे. येणारी प्रत्येक निवडणूक जिंकण्यासाठी लढायची आहे या दृष्टीने सतत कार्यरत रहा, असे प्रतिपादन राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी शनिवारी (दि.११) केले.

नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायतींच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने घवघवीत यश संपादन केले आहे. त्या अनुषंगाने उत्तर रायगडातील नवनिर्वाचित सरपंच व सदस्यांचा सत्कार उत्तर रायगड जिल्हा भाजपच्या वतीने मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली समारंभपूर्वक करण्यात आला. त्या वेळी ना. चव्हाण बोलत होते.

उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्टस् कॉम्प्लेक्समध्ये झालेल्या या सोहळ्यास प्रमुख मान्यवर म्हणून मावळ लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, श्रीनंद पटवर्धन, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, नितीन पाटील, प्रकाश बिनेदार, पनवेल तालुका मंडल अध्यक्ष अरुणशेठ भगत, उरण तालुका मंडल अध्यक्ष रवी भोईर, शहर अध्यक्ष कौशिक शाह, कामोठे मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, कर्जत मंडल अध्यक्ष राजेश भगत, खालापूर मंडल तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे, विधानसभा अध्यक्ष किरण ठाकरे, खोपोली मंडल अध्यक्ष रमेश रेटरेकर, पनवेल तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित जाधव आदी पदाधिकारी, नवनिर्वाचित सरपंच, सदस्य आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

### भाजप विस्तारतोय -लोकनेते रामशेठ ठाकूर

या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी यांच्यानंतर विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाजपचा कायापालट केला. आज ते जगात सर्वांत लोकप्रिय नेते आहेत, तर भाजप सर्वांत मोठा पक्ष आहे. राज्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मोठे मन दाखवून कार्यरत आहेत. भाजपची विचारसरणीच मी नव्हे; तर आम्ही अशी आहे. म्हणून आपला पक्ष मोठ्या प्रमाणात विस्तारत आहे. अशाच प्रकारे एकजुटीने व नेटाने काम करीत राहिल्यास येणाऱ्या सर्व निवडणुका आपण जिंकू याची खात्री आहे.

मंत्री रवींद्र चव्हाण यांनी आपल्या भाषणात पुढे म्हटले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नऊ वर्षांच्या कालावधीत विविध योजना, निर्णय, उपक्रम राबवून सर्वसामान्यांना जीवनात आधार दिला आहे. राज्यातही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ते मुख्यमंत्री असल्यापासून विविध लोकोपयोगी कामे करून जनतेचा विश्वास जिंकला आहे. रायगड जिल्ह्यात लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली काम करताना येणाऱ्या काळात पक्षाची ताकद आणखी वाढवायची आहे. त्यासाठी प्रत्येकाने सक्रिय राहणे आवश्यक आहे.

ग्रामपंचायत निवडणुकीत भाजपने बाजी मारली आहे. मंत्री रवींद्र चव्हाण यांच्यामुळे अशा स्थानिक निवडणुकीतही आपल्या प्रगतीचा आलेख उंचावत गेला आहे. ते आता आपल्या जिल्ह्याचे पालकमंत्री नसले तरी पालक आहेत, असे सांगून सबका साथ सबका विकास या पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कार्यप्रणालीने आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या क्रियाशील शैलीने पुढे वाटचाल करूया, असे आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.

ग्रामपंचायत निवडणुकीत भाजपविरोधात आता विरोधी पक्षांना एकत्र यायला लागत आहे, तर भाजप ताकदीने लढत आहे. आजपर्यंत इतिहासापासून शेकापकडे असलेली सोमटणे ग्रामपंचायत भाजपने या वेळी जिंकली. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली न्हावे ग्रामपंचायत घासून नाही, तर ठासून जिंकली. भविष्यातही विकासाचे समाजकारण करून उमेदीने पुढे जाऊया, असे आवाहन आमदार महेश बालदी यांनी केले.

जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनीही विचार मांडून पक्ष बळकट करण्यासाठी प्रत्येकाने काम करावे, असे आवाहन केले.

या वेळी मान्यवरांच्या हस्ते नवनिर्वाचित सरपंच व सदस्यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

**बंगळुरू : विश्वचषक स्पर्धेतील अखेरच्या साखळी सामन्यात भारतीय संघाने नेदरलँड्सविरुद्ध ४१० धावांचा डोंगर उभारला. भारताकडून श्रेयस अय्यर (९४ चेंडूंत नाबाद १२८ धावा) व केएल राहुल (६४ चेंडूंत १०२ धावा) यांनी शतकी खेळी केली, तर कर्णधार रोहित शर्मा (५४ चेंडूंत ६१ धावा), शुबमन गिल (३२ चेंडूंत ५१ धावा) व विराट कोहली (५६ चेंडूंत ५१ धावा) यांनी अर्धशतक केले. खरंतर हा सामना औपचारिकता होती, कारण भारत आधीच उपांत्य फेरीत पोहचला आहे. न्यूझीलंडविरुद्धचा भारताचा हा सामना १५ नोव्हेंबर रोजी मुंबईत रंगणार आहे.**



# कोपर येथील सामाजिक सभागृहाचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरणचे आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक आमदार निधीतून कोपर गाव येथे सामाजिक सभागृह बांधण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि.१२) करण्यात आले.

आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून उरण मतदारसंघात विविध विकासकामे सुरू आहेत या अंतर्गत कोपर गावातील समाजमंदिर बांधण्याचे काम स्थानिक आमदार निधी २५.१५ या अंतर्गत करण्यात येणार आहे.





भूमिपूजन समारंभास गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, सदस्य रोशन म्हात्रे, भाजप वाहतूक संघटना जिल्हा उपाध्यक्ष हेमंत ठाकूर, भाजप कोपर गाव अध्यक्ष सुधीर घरत, कोपर ग्रामस्थ मंडळ अध्यक्ष वैभव घरत, भाऊ भोईर, काशिनाथ पाटील, कमलाकर देशमुख, कमलाकर घरत, किशोर पाटील, उलवे नोड उपाध्यक्ष अनुताई घरत, इंदूताई घरत, कॉन्ट्रॅक्टर मयूर ठाकूर आदी उपस्थित होते.

# गुंतवणूकदारांसाठी दिवाळी मालामाल!

### सरत्या वर्षभरात कमाईची कोटीच्या कोटी उड्डाणे



**मुंबई : प्रतिनिधी**

दिवाळीचा सण शेअर बाजार आणि बाजारातील गुंतवणूकदारांसाठी खास असतो. हा सण बाजारासाठी नवीन वर्षाची सुरुवात दर्शवितो. सरत्या वर्षभराचा कालावधी हा शेअर बाजारासाठी खूप चांगला ठरला आहे. गेल्या वर्षभरात गुंवतणूकदारांनी तब्बल ६४ लाख कोटी रुपयांची कमाई केल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होत आहे.

संवतच्या संदर्भात बोलायचे झाले तर शेअर बाजारातील जुने वर्ष रविवारी (दि. १२) संपले असून नवीन वर्ष सुरू होत आहे. त्या निमित्ताने संध्याकाळी एक तासाचा विशेष मुहूर्त ट्रेडिंग होता. मागील एक वर्ष म्हणजे २०७९ संवतबद्दल बोलायचे झाले तर ते शेअर बाजारासाठी शुभ सिद्ध झाले आहे. या कालावधीत निफ्टी ५० सुमारे १० टक्क्यांनी वाढला आहे. संवतमध्ये सेन्सेक्स आणि निफ्टी या दोघांनीही नवा ऐतिहासिक उच्चांक नोंदवला.

गेल्या दिवाळीपासून या दिवाळीपर्यंतच्या आकड्यांवर नजर टाकली तर बाजारातील गुंतवणूकदारांनीही या काळात मोठी कमाई केली आहे. हिंडेनबर्ग अहवाल, भू-राजकीय तणाव, कच्चे तेल आणि डॉलरची वाढ, विक्रमी महागाई आणि परकीय गुंतवणूकदारांची अधूनमधून विक्री यासारख्या आव्हानांवर मात करीत गेल्या वर्षभरात बाजारात अनेक बदल झाले आहेत. सर्वात मोठा बदल म्हणजे डीआयआय म्हणजे देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांनी एफपीआयवर मात केली.

गेल्या संवत आणि या संवत दरम्यान शेअर बाजारातील गुंतवणूकदारांच्या संपत्तीत ६४ लाख कोटी रुपयांची मोठी वाढ झाल्याचे आकडेवारीवरून दिसून येते.

# पनवेलमध्ये दिव्यांच्या माध्यमातून साकारली श्री राम मंदिराची प्रतिकृती





# प्रसिद्ध वडाळे तलाव येथे दीपोत्सव उत्साहात साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवाळीनिमित्त दिव्यांची पूजा करून प्रार्थना केली जाते. यालाच अनुसरून शनिवारी (दि.११) पनवेलमध्ये दीपोत्सव साजरा झाला. या वेळी दिव्यांच्या लख्ख प्रकाशामुळे शहरातील वडाळे तलाव परिसर उजळून गेला होता.

पनवेल महापालिका आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या वतीने तिमिरातून तेजाकडे जाणारा दीपोत्सव साजरा झाला. या वेळी वडाळे तलाव परिसर दिव्यांच्या प्रकाशाने सजला होता. या प्रकाशाच्या उत्सवाचा शुभारंभ आयुक्त गणेश देशमुख आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत झाला. २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्येत श्री राम मंदिराची प्राणप्रतिष्ठापना होणार आहे. या पार्श्वभूमीवर वडाळे तलाव येथील दीपोत्सवात श्री राम मंदिराची प्रतिकृती दिव्यांच्या माध्यमातून साकारली गेली.

दीपोत्सवावेळी भाजप शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी उपमहापौर चारुशिला घरत, माजी नगरसेविका रूचिता लोंढे, राजश्री वावेकर, दर्शना भोईर, वृषाली वाघमारे, मंदा भगत, सुहासिनी केकाणे, अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, सुमित झुंझारराव, रोहित जगताप, अक्षय सिंग यांच्यासह इतर मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कितीही मोठे झालो तरी आपल्या लोकांना विसरता कामा नये -मुख्यमंत्री

**ठाणे : प्रतिनिधी**

सीएमची व्याख्या फक्त 'चीफ मिनिस्टर' नाहीतर 'कॉमन मॅन' अशी होते, असे विधान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. कुठलेही काम काम करताना कौशल्य आणि धाडस लागते. आपला हेतू शुद्ध असल्यावर कधीही घाबरायचे नाही, असेही मुख्यमंत्री शिंदेंनी सांगितले. दिवाळीनिमित्त ठाण्यात आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते.

एकनाथ शिंदे म्हणाले, २०१९ साली मला मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी मिळेल, अशी अनेकांची इच्छा होती, पण कोरोनाकाळामध्ये आला. कोरोना काळात चांगले काम करता आले. मुख्यमंत्री असतो, तर मर्यादा आल्या असत्या. रूग्णालयात आणि रूग्णांना आवश्यक तिथे मदत करण्याचे काम केले, मात्र आपल्याला काही धाडसी निर्णय घ्यावे लागतात. शेवटी कुठलेही काम करताना कौशल्य आणि धाडस लागते. आपला हेतू शुद्ध असल्यावर कधीही घाबरायचे नाही. जेव्हा जनतेचा फायदा असतो, तेव्हा बिंधास्त काम करायचे असते, मग काहीही घडो, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले.



माणूस कितीही मोठा झाला, तरी आपल्या लोकांना विसरता कामा नये. शेवटी पदे येतात आणि जातात. आपल्याकडील पदाचा लाखो आणि कोट्यवधी नागरिकांना फायदा कसा होईल, याकडे कटाक्षाने पाहिले पाहिजे. सीएमची व्याख्या फक्त 'चीफ मिनिस्टर' नाहीतर 'कॉमन मॅन' अशी होते, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

दरम्यान, मुख्यमंत्र्यांनी शनिवारीच राज्यातील नागरिकांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. आपल्या महाराष्ट्राच्या सर्वस्पर्शी विकासाचे स्वप्न साकार व्हावे यासाठी आणि जगाने गौरवपूर्ण वाटचालीची दखल घ्यावी यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करूया, असा निर्धार व्यक्त करीत त्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. दीपोत्सवाचे हे पर्व सर्वांच्या आयुष्यात मांगल्य आणि समृद्धी घेऊन येवो. सर्वांच्या आशा-आकांक्षा आणि संकल्प पूर्ण व्हावेत अशी मनोकामनादेखील मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली आहे.

राज्यातील जनतेच्या आयुष्यात आनंद यावा, त्यांची स्वप्ने साकार व्हावीत म्हणून आपले सरकार लोकांच्या हितासाठी प्रामाणिकपणे काम करीते आहे आणि पुढेदेखील करीत राहील, असा विश्वास व्यक्त करून मुख्यमंत्र्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# महापारेषणमध्ये सायबर सुरक्षा जागृती अभियान

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) मुख्य सांघिक कार्यालय, मुंबई येथे राष्ट्रीय सायबर सुरक्षा महिन्याअंतर्गत सायबर सुरक्षा जागृती अभियान राबविण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) नागसेन वानखेडे यांनी केले. प्रारंभी महापारेषण कंपनीच्या सहाय्यक प्रोग्रॅमर अमृता जगदाळे-मिस्त्री यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना सायबर सुरक्षेसाठी प्रतिज्ञा दिली.



याप्रसंगी संचालक (वित्त) अशोक फळणीकर, संचालक (मनुष्यबळ विकास) सुगत गमरे, संचालक (प्रकल्प) (प्रभारी) सुनील सूर्यवंशी, कार्यकारी संचालक (संचलन) रोहिदास मस्के, मुख्य अभियंता पीयूष शर्मा, सुनील शेरेकर, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) कैलास कणसे, मुख्य महाव्यवस्थापक(वित्त व लेखा) संतोष आंबेरकर, मुख्य विधी सल्लागार कीर्ती कुळकर्णी, अधीक्षक अभियंता किशोर गरूड, अजय पटेल, उपमहाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) वर्षा असोलकर, सहाय्यक महाव्यवस्थापक (ईआरपी) लीना कसरेकर, प्रणाली विश्लेषक अतुल वारजुरकर, अनिल सोनवणे, बाबासाहेब कांबळे यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचारी दूरदृश्य प्रणालीव्दारे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार मंजूषा चौधरी यांनी मानले.

# वांद्रे-वरळी सी लिंकवरून तरुणाने केली आत्महत्या

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईमधून धक्कादायक घटना समोर आली आहे. वांद्रे-वरळी सी लिंकवरून २७ वर्षीय तरुणाने उडी मारून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आकाश सिंह असं आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. त्याने नैराश्यातून आत्महत्या केल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार आत्महत्या करारा आकाश सिंह हा परळ येथील रहिवासी होता. माझा मोबईल खाली पडला असा सांगत तो टॅक्सीमधून सी लिंकवर उतरला. त्यानंतर त्याने खाली उडी मारली. मच्छीमार नौकांच्या मदतीने पोलिसींनी आकाश सिंह याचा मृतदेहाचा शोध घेतला. शुक्रवारी रात्री तो वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्सहून परळला जाण्यासाठी टॅक्सीत बसला, पण नंतर त्याने ड्रायव्हरला सी लिंकवर नेण्यास सांगितले, असे वरळी पोलिसांच्या एका अधिकाऱ्याने सांगितले.

सी लिंकवर असताना, त्याने अचानक त्यांचा मोबाईल फोन खाली पडला आहे, असं सांगून ड्रायव्हरला टॅक्सी थांबवण्यास सांगितले, असे अधिकाऱ्याने सांगितले. ड्रायव्हरने टॅक्सी बाजूला घेतल्यावर तो खाली उतरला आणि त्याने सी लिंकवरून समुद्रात उडी मारली. त्याचा मृतदेह रात्री उशिरा बाहेर काढण्यात आला, असे अधिकाऱ्याने सांगितले.

प्राथमिक तपासानुसार आई-वडिलांसोबत राहणाऱ्या सिंगचे तीन महिन्यांपूर्वी प्रेयसीसोबत ब्रेकअप झाले होते. पोलीस पुढील तपास सुरू आहे.

# दिवाळी कार्यक्रमाने मुरूडकर मंत्रमुग्ध

**मुरुड : प्रतिनिधी**

दिवाळी निमित्ये मुरुडच्या नावाबकालीन सार्वजनिक वाचनालय आयोजित दिवाळी पहाट कार्यक्रम सुंदर झाला. कार्यक्रमाची सुरवात वाचनालय सदस्य दीपाली जोशी व कार्यकारणी सदस्य यांनी दीपप्रज्वलन करून केले. या वेळी वाचनालयाचे अध्यक्ष जयवंत अंबाजी, संजय गुंजाळ, विजय करंबे आदी होते.

गायनाची सुरवात पूजा सदरे यांच्या इशस्तववने झाली. प्रसिद्ध गायक सुरेश सदरे, राहुल वर्तक, सिद्धेश करंबे, अमोल रणदिवे यांच्या गीते सादर झाली. वादक महेश सुर्वे, सिद्धेश पालशेतकर यांनी रसिकांना खरा आनंद दिला. कोरोनामुळे गेली तीन वर्ष खंड पडलेल्या दिवाळी पहाट कार्यक्रम प्रेक्षकांच्या आवडीचा ठरला. निवेदिका प्रेरणा चौलकर यांनी अतिशय सुंदर निवेदन करून गाण्याबाबतची दाद तत्काळ देऊन गायकांचा उत्साह वाढवला. कलासागरचे अध्यक्ष संजय गुंजाळ यांनी मुरूडमधील गायकांना प्रोसाहन देण्यासाठी, असे कार्यक्रम करण्याची गरज असल्याचे सांगितले.



**नवी मुंबई : दिवाळी म्हणजे प्रकाशाचा सण. यानिमित्ताने महापालिकेच्या मुख्यालयास नयनरम्य विद्युत रोषणाई करण्यात आलेली आहे.**

# हवा गुणवत्तेच्या मानकांचे नियम न पाळणाऱ्यांवर होणार कारवाई

## आयुक्त राजेश नार्वेकर यांचे निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील हवा गुणवत्तेबाबत उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार नवी मुंबई महापालिकेने तत्पर कार्यवाही करण्यास सुरुवात केली असून नमुंमपा आयुक्त राजेश नार्वेकर यांनी संबधित अधिकाऱ्यांची तातडीने बैठक घेत डेब्रीज नियंत्रणासाठी भरारी पथके २४ तास अधिक कृतीशील करण्याचे तसेच बांधकाम साईट्सवर विशेष लक्ष देत त्याठिकाणीही आवश्यक उपाययोजना केल्या जात असल्याची खात्री करून घेण्यासाठी विभागनिहाय विशेष पथके त्वरित स्थापन करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

बृहन्मुंबई महापालिकेने हवा गुणवत्ता नियंत्रण आराखडा तयार केला असून नवी मुंबई महापालिकेनेही देखील हा आराखडा अंगीकृत करीत असल्याचे सांगत आयुक्तांनी याबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्याचेही निर्देश दिले. या वेळी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले, शहर अभियंता संजय देसाई, परिमंडळ १ उपआयुक्त श्री. सोमनाथ पोटरे व परिमंडळ २ उपआयुक्त डॉ. श्रीराम पवार, शिक्षण विभागाचे उपआयुक्त दत्तात्रय घनवट, अतिरिक्त शहर अभियंता शिरीष आरदवाड आणि इतर अधिकारी प्रत्यक्ष तसेच अतिरिक्त आयुक्त विजयकुमार म्हसाळ, सहा. संचालक नगररचना सोमनाथ केकाण व आठही विभागांचे सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी ऑनलाईन उपस्थित होते.शहराचे पर्यावरण व हवा गुणवत्ता चांगली रहावी ही आपल्या सर्वांचीच प्राधान्याने जबाबदारी असून त्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना गांभीयाने कराव्यात असे निर्देश आयुक्तांनी या वेळी दिले. उच्च न्यायालयाने विभाग अधिकाऱ्यांवर याबाबतची जबाबदारी निश्चित केली असून क्षेत्रीय स्तरावर सतर्क राहण्याचे आयुक्तांनी निर्देशीत केले. याबाबतच्या मार्गदर्शक सूचना आयुक्तांमार्फत निर्गमित करण्यात आल्या आहेत. हवा गुणवत्तेच्या मानकांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती अथवा संस्था यांच्यावर कारवाई करण्यात येईल असेही या वेळी सूचित करण्यात आले.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रात सात ठिकाणी हवा गुणवत्ता मापन केंद्रे कार्यान्वित असून याठिकाणच्या रिडींगचे दर दोन तासांनी निरीक्षण करावे व त्यामध्ये आढळणाऱ्या रिडींगप्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी असेही आयुक्तांमार्फत निर्देशित करण्यात आले. बांधकाम साईट्स तपासण्यासाठी नगररचना व अभियांत्रिकी विभागातील अभियंत्यांची विशेष पथके विभागनिहाय गठीत करण्यात आली असून त्यांनी दररोज केलेल्या कार्यवाहीचा तपशील वेबपेजवर नियमीत अपलोड करावयाचा आहे असेही निर्देश देण्यात आले.

नवी मुंबई शहराची ओळख स्वच्छ शहराप्रमाणेच पर्यावरणशील शहर अशीही असून माझी वसुंधरा अभियानामध्ये मानांकित असलेल्या आपल्या शहराची ओळख हवा गुणवत्तेतही उत्तम असावी याकरिता संबधीत प्रत्येक घटकाने आपापली जबाबदारी पार पाडावी असे अधिका-यांना निर्देश देत सुजाण नवी मुंबईकर नागरिकांनी याकामी संपूर्ण सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त राजेश नार्वेकर यांच्यामार्फत करण्यात आले आहे.

# दिवाळीनिमित्त चित्रकला स्पर्धा

**मुरूड : प्रतिनिधी**

दिवाळी पहाटचे औचित्य साधून श्री दत्त देवस्थान ट्रस्ट मंडळ मुरुड-जंजिरा तर्फे चित्रकला स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धात ३४ मुला-मुलीनी सहभाग नोंदविला. भगवान श्री गुरुदेव दत्त यांच्या चरणी पुष्पहार अर्पण मान्यवरांच्या शुभ हस्ते श्रीफळ वाढवून चित्रकला स्पर्धाला सुरुवात करण्यात आली.



या वेळी चित्रकला स्पर्धे करिता तीन गट करण्यात आले होते. प्रथम गट ५वी ७वी या स्पर्धकांना मंदिर परिसरातुन दिसणारा निसर्ग देखावा अथवा समुद्राकिनारा व पद्मदुर्ग किल्ला अथवा दत्त मंदिर परिसर, व्दितीय गट ८ वी १० वी या स्पर्धेकांना मंदिर परिसरातील दिसणारा निसर्ग देखावा अथवा समुद्राकिनारा व जंजिरा किल्ला अथवा खार अंबोली परिसर व डॅम, तृतीय गट ११ वी खुला गट स्पर्धाकांन करिता भक्त निवास व सभोवतालचा परिसर / गारंबी व सवतकडा निसर्ग/ दत्तगुरुच्या भावमुद्रा

या वेळी अध्यक्ष प्रमोद भायदे, उपाध्यक्ष वसंत पाटील, सचिव आदेश दांडेकर, खजिनदार रामकृष्ण आरेकर, पुजा समिती अध्यक्ष विनायक रांजणकर, सदस्य विजय वाणी, मंगेश पोकळ, सुशील माळी, परिक्षक महेंद्र पाटील, प्रवीण बैकर, अभय दिवेकर, विजय सुर्वे इतर सदस्य उपस्थित होते. या वेळी चित्रकला स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले.

# विहूर आदिवासीवाडीत दिवाळी फराळाचे वाटप

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरातील पदमदुर्ग व्यवसायिक मंडळातर्फे विहूर येथील आदिवासी वाडी येथे दिवाळी फराळाचे वाटप मोठ्या स्वरूपात करण्यात आले. समाजापासून वंचित व जंगल भागात राहणाऱ्या आदिवासी लोकांना सुद्धा दिवाळी फराळ मिळावा यासाठी पदमुर्ग मंडळाने पुढाकार घेऊन गेली पाच वर्षांपासून हा उपक्रम राबवत आहे. यासाठी ही संघटना स्वतःचे पैसे खर्च करून दिवाळी फराळ बनवून असंख्य आदिवासी समाजाला या फराळाचे वाटप करण्यात येते. विहूर येथील २५ आदिवासी कुटुंबाना फराळ वाटप करण्यात आला. या वेळी पदमदुर्ग व्यवसायिक मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर, महेंद्र पाटील, दामोदर खरगावकर, निकेश बोर्डे व असंख्य आदिवासी बांधव उपस्थित होते.



# पाचवी, आठवीच्या शिष्यवृत्तीधारकांना १९ कोटींचे वितरण

**पुणे : प्रतिनिधी**

शालेय शिक्षण विभागाच्या पाचवी व आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेतील ३२ हजार ६६७ शिष्यवृत्तीधारकांना नवीन दराने १९ कोटी रुपयांचे वितरण दीपावलीच्या पार्श्वभूमीवर करण्यात आले आहे, अशी माहिती योजना शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिली.

२०१५च्या शासन निर्णयानुसार पाचवी व आठवीच्या इयत्तेत शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाते. याबाबत शिक्षण संचालनालयाचे उपसंचालक राजेश क्षीरसागर म्हणाले की, पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती ही गुणवान विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहनासाठी देण्यात येते. पाचवीसाठी एकूण संच संख्या १६ हजार ६८३ असून आठवीसाठी १६ हजार २५८ संच संख्या आहे. पाचवीच्या परीक्षेतून शिष्यवृत्तीधारक ठरलेल्या व पुढे सहावी, सातवी, आठवीत शिक्षण घेणाऱ्या एकूण ५० हजार ४९ विद्यार्थ्यांना, तर आठवीच्या परीक्षेतून शिष्यवृत्तीधारक ठरलेल्या व इयत्ता नववी व इयत्ता दहावीमध्ये शिक्षण एकूण ३२ हजार ५१६ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते.

# शिवाजी भासे अध्यक्षपदी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील कोतवाल नगर रहिवासी संघाची नवीन कार्यकारिणी निवडण्यात आली आहे. अध्यक्षपदी शिवाजी भासे यांची बिनविरोध निवड झाली.

कार्यकारिणीत प्रशांत सानप उपाध्यक्ष, निलेश शिंदे सचिव, अभिजित पवार सहसचिव, आकाशदिप शिवदे खजिनदार, सुरज तांडेल सहखजिनदार, तर सदस्य म्हणून हरिभाऊ तापकिर, सतिष जाधव, संतोष भासे, भालचंद्र पाटील, अविनाश निगुडकर, हेमंत ठाणगे, दामोदर दुर्गे, भगवान देशमुख, दिनेश सोलंकी, सुहास प्रधान, विजयकुमार धारप, अरुण मालुसरे, विजय बेडेकर, पांडुरंग सानप, पंकज पाटील, सुनील अहिरे, असिफ मिर्झा यांची निवड करण्यात आली.

# नवी मुंबई महापालिकेच्या प्रसारमाध्यम प्रतिनिधींसोबत दिवाळी स्नेहसंमेलन

**नवी मुंबई : बातमीदार**

प्रसारमाध्यमे ही नागरिक आणि महापालिका यांच्यामधील अत्यंत महत्वाचा दुवा असून देशातील सर्वात मोठ्या प्रमाणात साजऱ्या होणाऱ्या दिवाळी सणाच्या निमित्ताने माध्यम प्रतिनिधींशी संवाद व्हावा आणि विचारांचे, शुभेच्छांचे आदान-प्रदान व्हावे याकरिता दिवाळी स्नेहसंमेलनासारखा उपक्रम राबविण्याचे ठरविले आणि त्याला इतक्या मोठ्या प्रमाणात उत्साही प्रतिसाद देऊन हा उपक्रम यशस्वी केल्याबद्दल माध्यम प्रतिनिधींचे स्वागत करीत नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.



दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर नमुंमपा आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या संकल्पनेतून प्रसारमाध्यम प्रतिनिधींसमवेत दिवाळी स्नेहसंमेलनाचे आयोजन महापालिका मुख्यालयात करण्यात आले होते. या वेळी विविध वृत्तपत्रे व वृत्तचित्रवाहिन्यांचे प्रतिनिधी, कॅमेरामन मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आयुक्त महोदयांसमवेत अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व विजयकुमार म्हसाळ, शहर अभियंता संजय देसाई, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, मुख्य लेखा परीक्षक जितेंद्र इंगळे, उपायुक्त मंगला माळवे, ललिता बाबर, दत्तात्रय घनवट, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

या वेळी पत्रकारांनी आयुक्तांमार्फत प्रसारमाध्यम प्रतिनिधींसमवेत दिवाळी फराळासह स्नेहसंमेलनाचे आयोजन ही संकल्पनाच सकारात्मक भावना निर्माण करणारी असल्याचे सांगितले. अशाप्रकारे आयुक्तांनी पुढाकार घेऊन प्रसारमाध्यम प्रतिनिधींशी संवादी असणे यामधून माणसे जोडण्याचा त्यांच्या व्यक्तिमत्वाचे दर्शन घडते असेही ते म्हणाले. हा अत्यंत स्तुत्य उपक्रम असल्याचे अभिप्राय देत सर्व पत्रकार बंधू-भगिनींच्या वतीनेही आयुक्त राजेश नार्वेकर आणि महापालिका प्रशासनास दिवाळी शुभेच्छा प्रदान करण्यात आल्या.

## दुखवटा

### सुलोचना गायकवाड



**माणगाव :** माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचे व्यवस्थापक पुंडलिक गायकवाड यांच्या मातोश्री सुलोचना तुकाराम गायकवाड (वय ७५) यांचे शनिवारी (दि. ११) देगाव येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन सुना, नातवंडे असा परिवार आहे. कै. सुलोचना गायकवाड यांचा दशक्रिया विधी सोमवारी (दि. २०) तर उत्तरकार्य विधी बुधवारी (दि. २२) देगाव येथे होणार आहे.

### सुभाष गायकवाड



**कर्जत :** भारतीय बौद्ध महासभा माजी शहराध्यक्ष सुभाष रामचंद्र गायकवाड यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. निधन समयी ते ६४ वर्षांचे होते. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कट्टर अनुयायी होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक पुत्र, सून, एक कन्या, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## निवडक

### अपघातामध्ये महिलेचा मृत्यू

**पनवेल :** टँकरने मोटरसायकलला कट मारल्यामुळे महिला खाली पडली व तिच्या डोक्यावरून टँकरच्या पाठीमागील चाक गेल्यामुळे तिचा मृत्यू झाल्याची घटना करंजाडे, सेक्टर दोन येथे घडली. या प्रकरणी टँकरचालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. हुसेफा ताहेरअली आरिफ (रा. सेक्टर चार, करंजाडे) हे मोटरसायकलने पत्नी खतीजा आरिफ व मुलगी जहारा आरिफ हे राहत्या घरातून सेक्टर २, करंजाडे येथील मुलीच्या मैत्रिणीकडे वाढदिवसासाठी घरी जात होते. रात्री साडेआठच्या सुमारास शीतलादेवी मंदिरजवळ सेक्टर दोन ए, करंजाडे येथे टँकरवरील चालकाने त्याच्या ताब्यातील टँकर भरधाव चालवून मोटरसायकलला कट मारल्यामुळे पत्नी मोटरसायकलवरून खाली पडली. या अपघातात तिच्या डोक्यावरून पाठीमागील चाक गेल्याने तिचा मृत्यू झाला.

### क्रेडिट कार्ड नंबरवरून ऑनलाईन गंडा

**पनवेल :** अँड्रॉइड मोबाइलमध्ये आय मोबाइल ॲप डाउनलोड करण्यास सांगून आणि क्रेडिट कार्ड नंबरवरून ९४ हजार ९२० रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याची घटना खारघर येथे घडली आहे. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात अमित शिंदे या अनोळखी व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून सय्यद मंजर सय्यद मोहम्मद हुसेन असे फसवणूक झालेल्याचे नाव आहे. ते खारघर येथे राहतात. अमित शिंदे याने क्रेडिट कार्डमधून ९४ हजार ९२० रुपये काढून घेतले.

# जनतेच्या हितासाठी भाजप सदैव कार्यरत

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन; कळंबोलीमध्ये दिवाळी पहाट कार्यक्रम उत्साहात

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

आपल्याला सामर्थ्य मिळत असल्याने आम्ही आपल्याला सोयी सुविधा देण्यास देऊन आपल्या जीवनात सुख येत राहू यासाठी आम्ही भारतीय जनता पक्षाचे सहकारी काम करत आहोत, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. माजी नगरसेवक बबन मुकादम यांनी कळंबोली येथे आयोजित दिवाळी पहाट कार्यक्रमात ते बोलत होते.

दिवाळीसणाचे औचित्य साधून कळंबोली येथे भारतीय जनता पक्ष कळंबोली शहर आणि बबन मुकादम मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच हरीश मोकल प्रस्तुत दिवाळी पहाटनिमित्त प्रभात स्वरांजली हा कार्यक्रम रविवारी (दि. १२) आयोजित करण्यात आला होता.





या कार्यक्रमाला मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत आयोजकांचे कौतुक केले.

ते म्हणाले की, पनवेल महापालिकेच्या माध्यमातून अनेक विकास कामे होत आहेत. या सोयी सुविधा मिळाव्या म्हणून आमचे सहकारी बबन मुकादम, अमर पाटील, रविनाथ पाटील, प्रिया मुकादम, प्रमिला पाटील, हरेश केणी हे सात्यत्याने प्रयत्न करत आहेत. पालिका सोयी सुविधा पोहचवेल तेव्हा पोहचवेल, पण बबन मुकादम यांच्या माध्यमातून ते पोहचविण्याचे काम केले जाते. आमचा पालिकेच्या माध्यमातून दर्जेदार रस्ते, उद्याने गटारे बनविण्याचे काम केले जात आहे. त्यासाठी भारतीय जनतेचे शिलेदार अगदी जीव ओतून काम करत आहेत. येथील जनतेची दिवाळी गोड व्हावी म्हणून दिवस रात्र काम करून कमी भावात दिवाळी फराळाचे वाटप भाजपच्या वतीने करण्यात आले. बबन मुकादम आणि प्रिया मुकादम यानी प्रत्येकाच्या जीवनात सुगंध दरवळत राहवा म्हणून कार्यक्रमाला येणाऱ्या प्रत्येकाला सोनचाफ्याचे फुल देत होते.

माजी नगरसेवक बबन मुकादम यांनी सांगितले की, आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपले नुकसान सहन करून कळंबोली मधील जनतेला फराळाचे वाटप करण्यात आले. चार दिवस वाटपाचा असलेल्या हा कार्यक्रम आणखी दोन दिवस वाढविण्याची मागणी कळंबोली मधील जनतेने केली होती. दिवाळी पहाट या कार्यक्रमासाठी या कार्यक्रमाला भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी स्थायी समिती सभापती अमर पाटील, माजी नगरसेवक हरेश केणी, माजी नगरसेविका प्रमिला पाटील आदीसह महिला वर्ग मोठ्या संख्येने संख्येने उपस्थित होता.

या वेळी भाजपच्या रायगड जिल्हा महिला उपाध्यक्षा प्रिया भोईर यांनी आयोध्यावारी कळंबोली महिलांची काढावी, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे केली याला आमदार ठाकूर यांनी सहमती दिली.







**पनवेल : दिवाळीनिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची त्यांच्या निवासस्थानी रविवारी विविध पदाधिकाऱ्यांनी भेट घेत आशीर्वाद घेतले व दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप नेते एकनाथ देशेकर, एस.के. नाईक, भाजप शहराध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, संजय भगत व शिक्षक वर्ग तसेच रवींद्र पाटील, लक्ष्मण पाटील यांच्यासह इतर मान्यवर आणि पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# उरण महाविद्यालयाची आदिवासींसोबत दिवाळी



**उरण : बातमीदार**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयाची माजी विद्यार्थी संघटना व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम एन. गायकवाड व प्रा. के ए शामा यांच्या मार्गदर्शनाखाली विंधणे आदिवासी वाडी येथील कातकरी बांधवांसोबत दिवाळी साजरी करण्यात आली.

या वेळी वाडीवरील १३० महिलांना साड्या व लुगडी वाटप केले तसेच एकूण १२५ पुरुषांना टॉवेल, एकूण ७० मुलांना शालेय साहित्य व विद्यार्थ्यांनी आणलेला घरी तयार केलेला दिवाळीचा फराब वाटप करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम एन. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांमध्ये गरीब समाजा प्रति आत्मीयता वाढावी व त्यांच्यामध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी हा या कार्यक्रमाचा उद्देश असल्याचे सांगितले. रमेश ठाकूर (महाविद्यालय विकास समितीचे सदस्य) उपस्थित होते.

प्राचार्य बी. एन. गायकवाड २००० रुपये, के.ए.शामा ५००० रुपये, प्रा. व्ही एस इंदुलकर ५००० रुपये, डॉ. पराग कारुलकर ४००० रुपये, टी. एन. घ्यार ५००० रुपये, टीवायबीए माजी विद्यार्थी ३००० रुपये, माजी विद्यार्थ्यांमध्ये विशाल पाटेकर (मी उरणकर सामाजिक सांस्कृतिक संघटना) १०००० रुपये, सुरज म्हात्रे १०००० रुपये, नरेंद्र पाटील १०००० रुपये, तेजस आठवले २००० रुपये, रोहित पाटील ५००० रुपये, मंगेश म्हात्रे ३००० रुपये, नवीन राजपाल ३००० रुपये तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आर्थिक मदत केली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्री विशाल पाटेकर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे, आयक्युएसी समन्वयक डॉ. ए. आर. चव्हाण, सुरज म्हात्रे महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली.

# सुधीर घरत यांच्यातर्फे दिवाळी फराळ, भेटवस्तू

**उरण : वार्ताहर**

दिवाळी सणाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी जपत सुधीर घरत सामाजिक संस्था नवघर उरण तर्फे उरण तालुक्यातील चिरनेर येथील केळ्याची माळ या आदिवासी वाडी वर आदिवासी बांधवाना दिवाळी फराळ व भेटवस्तू देऊन आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी करण्यात आली.

या वेळी सुधीर घरत सामाजिक संस्थेचे संस्थापक सुधीर घरत, अध्यक्ष जयप्रकाश पाटील, कार्याध्यक्ष जयप्रकाश भोईर, उपाध्यक्ष अजित पाटील, सेक्रेटरी संकेत कडू, सचिव हरेश बंडा, सदस्य ज्ञानेश्वर भोईर, सुधीर भाई घरत मित्र परिवार व विविध मान्यवर उपस्थित होते. नवनिर्वाचित ग्रामपंचायत सदस्य पद्माकर फोफेरकर, उरण विधानसभा युवक इंटक अध्यक्ष राजेंद्र भगत, सामाजिक कार्यकर्ते रोशन कातकरी, काँग्रेस युवा नेते पियुष पद्माकर फोफेरकर, सुप्रसिद्ध निवेदक नितेश पंडित आदींचे या कार्यक्रमाला विशेष सहकार्य लाभले.





**पनवेल : विशाल सावंत संपादित 'माझं पनवेल' या दिवाळी अंकाचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले. प्रकाशनावेळी भाजप शहर अध्यक्ष अनिल भगत, भाजप जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, युवा नेते केदार भगत आदी उपस्थित होते.**



**पनवेल : दिवाळीनिमित्त चिंचवण येथील अंश भोईर व अथर्व भोईर यांनी कर्नाळा किल्ला व अभयारण्याची प्रतिकृती साकारली आहे.**

# पनवेलमध्ये राजे शिवराय प्रतिष्ठानतर्फे दुर्गदर्शन सोहळा

**पनवेल : दादाराम मिसाळ**

दीपावलीनिमित्त राजे शिवराय प्रतिष्ठानच्या वतीने पनवेल येथे श्री देवगिरी किल्ल्याची भव्य प्रतिकृती उभारण्यात आली आहे. या प्रतिकृतीच्या दुर्गदर्शन सोहळ्याचे उद्घाटन शनिवारी (दि. ११) झाले. या वेळी जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचे ११वे वंशज हभप शिरीष महाराज मोरे तसेच कर्नल प्रशांत काकडे (आसाम रेजिमेंट) यांच्या हस्ते आणि ठाणे जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांच्या हस्ते गडपूजन झाले.

जनमानसात इतिहासाविषयी जागरूकता निर्माण व्हावी तसेच गडकोटांप्रति आदरभाव निर्माण व्हावा या उद्देशाने प्रतिष्ठान मागील १८ वर्षे सातत्याने पुणे तसेच पनवेल येथे कार्य करीत आहे. पनवेल विभागाचे संघटक संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. किल्ला अभ्यास मोहिमेपासून ते किल्ला उभारणीपर्यंत पनवेल विभागाच्या सर्व कार्यकर्त्यांनी खूप मेहनत घेतली. देवगिरी किल्ल्याची प्रतिकृती १८ नोव्हेंबरपर्यंत सर्वांना पाहण्यास खुली ठेवण्यात आली आहे.



गडपूजन कार्यक्रमास वारकरी महामंडळाचे संचालक हभप धनाजीमहाराज पाटील, राजे शिवराय प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महेश पोवळे यांच्यासह प्रतिष्ठानचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी पर्यावरण वाचवा हा संदेश घेऊन अयोध्या येथून चालत आलेल्या आशुतोष पांडे यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. आशुतोष यांनी आतापर्यंत ९४०० किलोमीटरचा देशातील विविध राज्यात पायी प्रवास केला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज होते म्हणून आज आपली संस्कृती आहे. तुम्ही आम्ही ताठ मानेने जगू शकलो. त्यांचा चुकीचा इतिहास सांगणाऱ्या लोकांना उत्तरे देण्यासाठी शिवचरित्र वाचा असे शिरीष महाराज्यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले.

मनोज सानप यांनी हुतात्मा कर्नल विनायक गोरे यांच्या आईचे आत्मकथन एकपात्री अभिनय करीत सादर करून अंगावर रोमांच उभे केले. या सोहळ्याचे उत्सव प्रमुख जितेश पवार तसेच कार्यक्रम प्रमुख वैभव झांबरे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संकेत भोसले यांनी केले, तर केतन गुरव यांनी आभार मानताना संत तुकारामांच्या अभंगाच्या ओळी म्हणत मने जिंकली.

# ॲड. मनोज भुजबळ यांच्याकडून कुष्ठरुग्णांना दिवाळी फराळवाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशानुसार ओबीसी मोर्चा प्रदेश संजय गाते यांचे मार्गदर्शनाने आमदार प्रशांत ठाकूर यांचे सहकार्याने महापालिका हद्दीतील गणेश (कुष्ठरुग्ण) वसाहतींमध्ये भाजप ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांनी कुटुंबासह भेट दिली. त्यांनी कुष्ठरुग्णांना दिवाळी फराळ देऊन त्यांच्यासोबत अल्पोपहार केला.

या वेळी माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, ॲड. प्रीती भुजबळ, ॲड. माधुरी भुजबळ, राकेश भुजबळ, अश्विनी राकेश भुजबळ, अशोक आंबेकर, शैला आंबेकर, जरिना शेख, गणेश भगत, उत्कर्ष मंडळाचे किशोर शिंदे, नितीन भुजबळ, अजित लोंढे, सिद्धेश भुजबळ, क्रांती चितळे आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# दिन दिन दिवाळी

तमसो मा ज्योतिर्गमय अर्थात अंधारातून उजेडाकडे असा संदेश देणाऱ्या दिवाळीचा सध्या देशभर उत्साह आहे. भारतातील सण-उत्सवांमध्ये दीपावलीचे विशेष महत्त्व आहे. सर्व जाती-धर्मांचे लोक तसेच गरीब-श्रीमंत सारेच ही दिवाळी साजरी करतात आणि आनंद लुटतात.

**पावसाळा संपून हिवाळ्याची चाहूल लागली की दिवाळी येते. दिवाळीचा इतिहास रामायणाशीही जोडलेला आहे. असे म्हटले जाते की प्रभू श्री रामचंद्रांनी माता सीतेला रावणाच्या कैदेतून मुक्त केले आणि ते अयोध्येला परतले. ज्या निमित्ताने अयोध्येच्या लोकांनी दिवे लावले होते. तेव्हापासून दिवाळी साजरी केली जाते. अश्विन वद्य त्रयोदशीपासून कार्तिक शुद्ध द्वितीयेपर्यंत असणाऱ्या दिवाळीच्या विविध दिवसांचे आगळे असे महत्त्व आहे. कधी कधी दोन यातील दोन सण एकत्र येतात, जसे की यंदा नरकचतुर्दशी आणि लक्ष्मीपूजन एकाच दिवशी आलेले आहेत. दिवाळीची सुरुवात वसुबारसने होते. हा दिवस दिवाळीला जोडून येतो, म्हणून त्याचा समावेश दिवाळीत केला जातो, पण वस्तुत: तो सण वेगळा आहे, मात्र देशातील बहुतांश ठिकाणी वसुबारसेपासून दिवाळीला सुरुवात होते असे मानले जाते. आपला भारत हा कृषीप्रधान देश असून आपल्याकडे पशुधनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भारतीय संस्कृतीत तर गाईला मातेचा दर्जा देण्यात आला असून ती पूजनीय आहे. तिच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी वसुबारसच्या दिवशी गाय आणि तिचे वासरू यांची पूजा केली जाते. अश्विन वद्य त्रयोदशीला धनत्रयोदशी असते. या दिवशी जो दीपदान करील त्याला अपमृत्यू येणार नाही, असे यमराजाने आपल्या दूतांना सांगितल्याची कथा आहे. म्हणून या दिवशी मंगलस्नान करून दीप लावतात. अश्विन वद्य चतुर्दशीस नकरचतुर्दशी हे नाव आहे. या दिवशी कृष्णाने नरकासुराचा वध केला व त्याच्या बंदिवासात असलेल्या सोळा हजार स्त्रियांना बंधमुक्त केले तसेच सत्यभामेने श्रीकृष्णाच्या साहाय्याने नरकासुराला मारले अशीही एक कथा आहे. अश्विन वद्य अमावस्येच्या रात्री लक्ष्मीपूजन असते. या निमित्ताने लक्ष्मीची पूजा केली जाते. कार्तिक शुद्ध प्रतिपदेस बलिप्रतिपदा हे नाव आहे. या दिवशी विष्णूने वामनावतार घेऊन बळीराजाला पाताळात लोटले. या दिवशी बलिपूजा करण्याचीही पद्धत आहे. या दिवसापासून विक्रम संवत सुरू होतो. म्हणून याला दिवाळी पाडवा म्हणतात. हिंदूंच्या साडेतीन शुभ मुहूर्तांपैकी हा अर्धा मुहूर्त आहे. या दिवशी पत्नीने पतीला ओवाळण्याची पद्धत आहे. कातिक शुद्ध द्वितीयेचे भाऊबीज हे नाव आहे. या दिवशी यम आपल्या बहिणीकडे गेला तेव्हा तिने त्याला ओवाळले आणि आनंद व्यक्त केला. तेव्हापासून बहिणीने भावाला ओवाळण्याची चाल रूढ झाली. अशी ही दिवाळी सर्वजण आनंदाने साजरी करतात. सर्वसाधारणपणे या काळात शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील कामे आटोपलेली असतात. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी हा सुगीचा काळ असतो. पुढच्या रब्बी हंगामाला सुरुवात करण्याआधी दिवाळी येत असल्याने काहीसा निवांत असलेला बळीराजाही ती घरात गोडधोड बनवून साजरी करतो. दिवाळी सर्वांसाठी काहीतरी घेऊन येते. याची लोक काही दिवस आधीपासून तयारी सुरू करतात. घरातील महिलावर्ग यानिमित्ताने फराळ बनवतात. बच्चेकंपनी फटाके फोडते. दीपावलीत दिवाळी अंकांचीही मोठी परंपरा आहे. हा वैचारिक फराळही साहित्यप्रेमी लोक आवडीने रसग्रहण करतात. दिवाळीच्या निमित्ताने सगळीकडे आनंददायी वातावरण आहे.**

# अन्नदाता बळीराजाची दिवाळी

**खबरबात**
**विजय मांडे**




दसरा सण झाला की दिवाळ सणाची ओढ सुरू होते. या दरम्यान नोकरदारवर्गाला बोनसची अपेक्षा असते, तर चिमुरड्यांची नवीन कपडे, फटाके आणण्याची व किल्ले तयार करण्याची लगबग असते. बाजारपेठा आकाशकंदिल, रांगोळीचे साहित्य, रोषणाईची दुकाने, फटाक्यांच्या दुकानांनी सजलेल्या असतात आणि शेतकरी तयार पीक सुरक्षित कसे घरात येईल या गडबडीत असतो. त्यातच दिवाळी साजरी करण्याची बळीराजाचा उत्साह असतो.

महाराष्ट्राच्या विविध भागात शेतकरीवर्ग विविध प्रकारे दिवाळी सण साजरा करतात. रायगड जिल्ह्यात बळीराजा हा सण अगदी उत्साहात साजरा करतो. त्यातही उत्तर रायगडमध्ये वेगळ्या प्रकारे दिवाळीचे सारेच दिवस साजरे करताना बळीराजा दिसतो. यंदा सोमवारी आठविंदा साजरा करण्यात आला. पूर्वी बांबूच्या साहाय्याने चटई बनवून त्याचा भात साठवण्याचा कणगा तयार केला जायचा. व त्यामध्ये भाताची साठवणूक केली जायची व तो शेणाच्या साहाय्याने लिपला जायचा, जेणेकरून त्यामधील भात वर्षभर टिकावा. असे कणगा शेतकऱ्याच्या अंगणात दिसत असत.

दिवाळी पाडव्याच्या साधारण आठ दिवस आधी आठींदा किंवा आठविंदा साजरा करण्यात येतो. त्या दिवशी संध्याकाळी दिवे लागणीच्या सुमारास अंगणामध्ये त्या-त्या घरातील सुहासिनी भात साठवण्याच्या कणग्याचे रांगोळीने भले मोठे चित्र काढतात. पूर्वी हे चित्र राख किंवा पिठाचा वापर करून काढली जायची. हे कणग्याचे चित्र काढल्यानंतर शेतातून तयार भाताच्या लोंब्या, चिराटे, दिवा लावून त्या चित्राची मनोभावे पूजा केली जाते व शेतातील पीक सुरक्षित घरी आणले म्हणून आनंद व्यक्त केला जातो. हल्ली कणग्याची जागा पिंपाने घेतली आहे.

शेतकऱ्याच्या दृष्टीने दिवाळी सणातील सर्वांत महत्त्वाचा दिवस म्हणजे 'दिवाळी पाडवा'. या शुभ दिनी पहाटेच उठून आपली गुरे (गाई, बैल, म्हशी, टोणगे) करण्यासाठी नेऊन सकाळी सहाच्या सुमारास घरी आणून त्यांना स्वच्छ धुवून काही ठिकाणी तर अगदी लहान बाळाला आंघोळ घालतात तशी गरम पाण्याने आंघोळ घालून त्यांची शिंगे कावेने रंगवली जातात. त्यांच्या अंगावरसुद्धा विविध प्रकारची फुले काढली जातात तसेच रंगीत कागदांची फुले तयार करून ती त्यांच्या अंगावर चिकटली जातात. अशा तयार केलेल्या पशुधनाची सुहासिनी आरती करतात. सुमारे आठच्या सुमारास गावामधील रस्त्यावर पेंढा आडवा टाकून तो पेटवला जातो आणि त्यावरून संपूर्ण गावातील गुरे उडवली जातात. लहान मुले या पेंढ्यांमधे फटाके लपवून ठेवतात. ते फटाके जसजसे फुटू लागतात तशी त्यावरून उडी मारून जाणारी गुरे घाबरून अधिक जोरात उडी मारून पळू लागतात. त्याचा आनंद लहान मुलांबरोबरच मोठी माणसेही घेतात. त्यानंतर ही सर्व गुरे गावातील माळरानावर आणून चरण्यासाठी सोडून देतात. या वेळी गावातील सारेच जण त्या माळरानावर येऊन फटाक्यांची आतषबाजी करतात. ही गुरे उडविण्याची पद्धत काही गावांमध्ये संध्याकाळी चार-पाचच्या सुमारासही केली जाते. आता गुरांची जागा पॉवर टिलर आणि ट्रॅक्टरने घेतली आहे. तरीही ज्यांच्याकडे गुरे आहेत ते हा सण अजूनही अगदी आनंदात साजरा करतात.

गेल्या काही वर्षांपासून लहरी हवामानामुळे हातातोंडाशी आलेले पीक भिजून जाते. त्यातच मजुरांची वानवा यांच्यामुळे भातशेती करणे अडचणीचे ठरत आहे. विशेष म्हणजे कोकणातील शेतकरी कितीही अडचणीत आला आणि त्याचे कुटुंबीय जरी उपाशी राहिले तरी कोकणातील शेतकरी आत्महत्या करण्याचा साधा विचारही करीत नाही. म्हणूनच कोकणातील शेतकऱ्यांना सलाम... दीपावलीच्या शुभेच्छा!... ही दिवाळी त्यांच्या जीवनात सुख आणि आनंद आणो ही ईश्वरचरणी प्रार्थना!




## बदलते तंत्रज्ञान

# ...तर गुगल बंद करू शकतं तुमचं जीमेल अकाउंट!



गुगल १ डिसेंबरपासून काही ठराविक जीमेल खाती बंद करण्यात येणार असल्याचे समजतेय. आपल्या अब्जावधी वापरकर्त्यांना पाठवलेल्या ईमेलमध्ये कंपनीने याबद्दल सविस्तर माहिती दिली आहे. दोन वर्षांहून अधिक काळ जर एखाद्या जीमेल अकाउंटवरून एकही ॲक्टिव्हिटी केलेली नसेल तर गुगलतर्फे ते खाते कोणतीही सूचना न देता थेट हटवण्यात येणार आहे. या खात्यावरील संपूर्ण डेटा अगदी तुमच्या ड्राइव्हमधील फोटो, व्हिडीओ, डॉक्युमेंट्स सगळं काही यामुळे तुम्ही कायमचं गमावून बसू शकता.

गुगलने दिलेल्या माहितीनुसार हे धोरण तुमच्या वैयक्तिक गुगल खात्यावर लागू होते. तुमच्या कार्यालय, शाळा किंवा इतर संस्थेद्वारे तुमच्यासाठी सेट केलेल्या कोणत्याही गुगल खात्याला हा नियम लागू होत नाही. अशा प्रकारचे निष्क्रिय खाते हे घोटाळेबाज व ऑनलाईन स्कॅमर्ससाठी तयार संधी असते. या अकाउंट्सवर अन्य युजर्सची फसवणूक तुमच्या नावे होऊ नये यासाठी गुगलने अशी खाती हटवण्याचा निर्णय घेतला आहे.

आपल्याला लगेचच घाबरून जाण्याची आवश्यकता नाही. गुगलतर्फे जर तुमचे खाते हटवण्यात येणार असेल तर त्यापूर्वी तुम्हाला सूचित केले जाईल. तुम्हाला जर अशा प्रकारची सूचना प्राप्त झाली किंवा तुमच्याकडे असे खाते आहे याची तुम्हाला अगोदरच कल्पना असेल. तर आपण खालील मार्गांनी आपले अकाउंट सक्रिय ठेवू शकता.

दर दोन वर्षांनी एकदा तरी तुमच्या जीमेल खात्यात साइन इन करा. तुमचे खाते सक्रिय राहील याची खात्री करण्याचा हा सर्वात सोपा मार्ग आहे. ई-मेल पाठवण्यासाठी आणि प्राप्त करण्यासाठी तुमचे जीमेल खाते वापरा. जरी तुम्ही दररोज जीमेल वापरत नसला तरीही, काही दिवसांच्या अंतराने एखादा तरी मेल या अकाउंटचा वापर करून पाठवा व प्राप्त करा. हे अकाउंट वापरून यूट्युब व्हिडीओ पाहणे हा तर सर्वात सोपा पर्याय आहे. गुगल ड्राइव्ह वापरा. गुगल सर्च वापरा. तृतीय-पक्ष ॲप किंवा सेवेमध्ये साइन इन करण्यासाठी या अकाउंटमधून साइन इन करा.

# आद्य मराठी नाटककार गोविंद बल्लाळ देवल

**निमित्त**



प्रसिद्ध नाटककार आणि नाट्यदिग्दर्शक म्हणून गोविंद बल्लाळ देवल यांची ओळख राहिली आहे. त्यांचा जन्म सांगली संस्थानातील हरिपूर येथे १३ नोव्हेंबर १८५५ रोजी झाला.

वडील बल्लाळ ऊर्फ बाळाजीपंत हे अल्प वेतनावर संस्थानी नोकर होते. देवलांचे ज्येष्ठ बंधू कृष्णाजीपंत यांचा संगीतशास्त्राचा मोठा व्यासंग होता. मधले बंधू रामभाऊ हे त्या काळी प्रसिद्ध असलेल्या इचलकरंजीकर नाटक मंडळीतील एक उत्तम नट होते. देवलांचे मराठी शिक्षण प्राथमिक शाळेत आणि संस्कृतचे अध्ययन खासगीरीत्या, हरिपूरला झाले असावे. वडील बंधूना नोकरी लागल्यावर कोल्हापूर व बेळगाव येथे माध्यमिक शिक्षण होऊन १८७८मध्ये ते मॅट्रिक झाले. बेळगावच्या रहिवासात सुप्रसिद्ध नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्याशी त्यांचा दाट परिचय झाला. पुढे पुण्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजातील शेतकी शिक्षणवर्गाचा अभ्यासक्रम पूर्ण करून देवलांनी १८८०मध्ये प्रमाणपत्र मिळविले. सांगलीचा नाट्यानुकूल परिसर, वडील बंधू संगीशास्त्रज्ञ, दुसरे बंधू हे कुशल नट आणि किर्लोस्करांसारखे मुरब्बी नाट्यगुरू असे त्यांच्या भोवतालचे वातावरण नाट्याला पोषक होते. साहजिकच अल्पकाळ शिक्षकाचा व्यवसाय केल्यावर देवलांनी हयातभर नाट्यसेवेला वाहून घेतले.

पुण्यात असताना देवल आणि शंकरराव पाटकर यांनी आर्योद्धारक नावाची नाटक मंडळी नाट्यकलेला नवे वळण लावण्याच्या हेतूने स्थापन केली. या मंडळीत असताना परशुरामपंततात्या गोडबोल्यांनी मराठीत अनुवादिलेल्या वेणीसंहार नाटकातील अश्वत्थामा आणि महादेवशास्त्री कोल्हटकरांच्या अथेल्लोमधील अजितसिंग या त्यांच्या भूमिका विशेष गाजल्या. महादेवशास्त्र्यांनी शेक्सपिअरच्या ऑथेल्लो या मूळ नाटकाचे भाषांतर केले होते. त्यावरून अजितसिंग ही रंगावृत्ती तयार करण्यात आली होती. ती करण्याच्या कामीही देवलांनी आपल्या लेखणीचा हातभार लावला. १८८० साली किर्लोस्कर नाटक मंडळी स्थापन झाली. किर्लोस्कर पद्धतीची नाट्यपदे रचण्यात देवल कुशल होते. किर्लोस्करांच्या शाकुंतलातील शकुंतलेची पदे देवलांनी रचली व त्या मंडळीचे ते आधारस्तंभ बनले. देवल निपुण नाट्यशिक्षकही होते. भाऊराव कोल्हटकर, नानासाहेब जोगळेकर, गणपतराव बोडस, काशिनाथपंत परचुरे, बालगंधर्व यांसारख्या नटश्रेष्ठांना देवलांनी तालीम देऊन तयार केले.

देवलांनी इंग्रजीवरून तीन, संस्कृतवरून तीन व एक स्वतंत्र अशी एकूण सात नाटके रचली. टॉमस सदर्नकृत द फेट्ल मॅरेजवरुन गॅरिकने तयार केलेल्या इझाबेला या रंगावृत्तीच्या आधारे दुर्गा (१८८६), शेक्सपिअरकृत ऑथेल्लोची रंगावृत्ती झुंझारराव (१८९०) व मर्फी आणि मोल्येर यांच्या अनुक्रमे ऑल इन द राँग आणि गॉनारेल या नाटकांवरुन फाल्गुनराव अथवा तसबिरीचा घोटाळा (१८९३) ही त्यांची परकीय नाट्यकृतींची रूपांतरे होत. पुढे फाल्गुनरावचे गंधर्व नाटक मंडळीसाठी केलेले संगीत रूपांतर संशयकल्लोळ (१९१६) हे कमालीचे लोकप्रिय ठरले. मृच्छकटिक (१८८९), विक्रमोर्वशीय (१८८९) व बाणाच्या कादंबरीवर आधारलेले शापसंभ्रम (दुसरी आवृत्ती १९००) ही त्यांची संस्कृताधारे रचलेली नाटके. त्यांच्या दुर्गा नाटकाला राजाराम कॉलेजचे, तर शापसंभ्रमला इंदूरच्या महाराजांचे पारितोषिक मिळाले होते, पण या दोन्ही नाटकांपेक्षा त्यांच्या मृच्छकटिक, झुंझारराव आणि संशयकल्लोळ यांना प्रायोगिक यश विशेष लाभले. तथापि यांहीपेक्षा त्यांचे सं. शारदा (१८९९) हे नाटक साहित्यिक आणि प्रायोगिक या दोन्ही दृष्टींनी अद्वितीय ठरले. शारदेसारखी अस्सल सामाजिक नाट्यकृती तत्पूर्वी मराठी रंगभूमीवर आलेली नसल्याने मराठी सामाजिक रंगभूमीचा पाया घालण्याचे श्रेय देवलांना मिळते. देवल हे सामाजिक मतप्रणालीच्या दृष्टीने रानडेपंथीय सुधारक होते. शेवटी काही वर्षे देवल रंगभूमीवरून निवृत्त झाले होते. मधुमेहाच्या विकाराने त्यांचे १४ जून १९१६ रोजी मिरज येथे देहावसान झाले. **(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**





**पनवेल : ग्रामसंवर्धन सामाजिक संस्था बांधनवाडीच्या वतीने चालवल्या जाणाऱ्या बालग्राम प्रकल्पातील बालकांनी दिवाळीसाठी रंगीबेरंगी पर्यावरणपूरक पणत्या तयार केल्या आहेत. या पणत्या बालकांसाठी मदत करणाऱ्या दात्यांना दिवाळीनिमित्त भेट देण्यात येणार आहेत.**

## आरोग्य प्रहर

# एनर्जी ड्रिंक घेताना सावधान! आजार वाढू शकतात...

प्रसिद्ध अमेरिकन फास्ट-फूड कंपनीच्या चार्ज्ड लेमनेड (लिंबू सरबत)मुळे २१ वर्षीय विद्यार्थिनी सारा कॅट्झचा मृत्यू झाल्याचे प्रकरण सध्या चर्चेत आहे. या विद्यार्थिनीला



लाँग क्यूटी टाइप १ सिंड्रोम होता. ही अशी एक स्थिती आहे, ज्यामध्ये हृदयाची विद्युत लय प्रभावित होऊन जीवघेणी परिस्थिती ओढवू शकते. अहवालांनुसार मृत तरुणीने कॅफिनयुक्त पेये टाळून ही स्थिती नियंत्रणात आणली होती, मात्र घटनेच्या दिवशी तिने ३९० एमजी कॅफिन असलेले अधिक कॅफिनेटेड एनर्जी ड्रिंक प्यायले होते. हे एक पेय कॉफीच्या चार कपांच्या बरोबरीचे होते आणि त्यादिवशी नंतर तिचे निधन झाले.

या घटनेने पुन्हा एकदा एनर्जी ड्रिंक्सच्या अतिसेवनाचे विशेषत: १८ वर्षाखालील तरुणांमधील दुष्परिणाम सर्वांसमोर आणले आहेत. जागतिक स्तरावरील अभ्यासांमध्ये असे दिसून आले आहे की, काही तरुण ग्राहकांमध्ये कॅफीन ॲलर्जीचा धोका दिसून आला आहे, ज्यामुळे शारीरिक बदल दिसून येऊ लागतात. जास्त प्रमाणात कॅफीन सेवन केल्याने टाकीकार्डिया होऊ शकतो, म्हणजे काय तर, तरुणांमध्ये अचानक हृदयाची धडधड अधिक गतीने होणे, मळमळ, उलट्या, डोकेदुखी अशी लक्षणे दिसून येतात. यामुळे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी कार्यात अडथळे येऊ शकतात. यात अगोदरच जर तुम्हाला कॅफिनची ॲलर्जी किंवा अन्य काही आजार असतील तर जोखीम आणखी वाढू शकते. एनर्जी ड्रिंकचा उत्तेजक प्रभाव झोपेमध्येसुद्धा व्यत्यय आणू शकतो परिणामी तुम्ही निद्रानाशसुद्धा अनुभवू शकता. पुरेशी झोप न झाल्याने नेहमीची कामे करण्यातसुद्धा अडथळा येऊ शकतो, मूड खराब होऊ शकतो.

क्लिनिकल आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून सतत एनर्जी ड्रिंकच्या सेवनामुळे लठ्ठपणा आणि दाताच्या समस्यांबद्दल चिंता निर्माण होते. अधिक साखर ही कॅलरी सेवन वाढण्यास कारणीभूत ठरते, ज्यामुळे कालांतराने वजन वाढण्याची शक्यता असते. अतिवजन हे परिणामी हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोगांसाठीसुद्धा जोखीम घटक सिद्ध होऊ शकते. याव्यतिरिक्त एनर्जी ड्रिंक्समधील साखर आणि आंबटपणामुळे दातांना धोका निर्माण होतो, ज्यामुळे पोकळी तयार होते तसेच दातांना सुरक्षित ठेवणारा दातांवरील थरसुद्धा नष्ट होऊ लागतो. तरुण वयात जेव्हा मज्जासंस्था अजूनही विकसित होत असतात तेव्हा उत्तेजक पेयांमुळे व्यवसानाधीनतेकडे वळण्याची गती अधिक वाढू शकते.

## रेल्वे आरक्षित तिकिटांच्या काळाबाजारावर छापे

# आरपीएफची दलालांवर कारवाई

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या रेल्वे सुरक्षा दलाने (आरपीएफ) रेल्वे आरक्षित तिकिटांच्या काळाबाजार अथवा दलालांचा सामना करण्यासाठी आणि बोनफाईड प्रवाशांचे हित जपण्यासाठी तिकीट दलालांविरुद्धची मोहीम तीव्र केली आहे. सायबर सेलकडून मिळालेल्या डेटा आणि इतर इनपुटच्या आधारे मध्य रेल्वेचे आरपीएफ पथक छापे टाकत आहे. मध्य रेल्वेच्या पाचही विभागातील खासगी ट्रॅव्हल्स एजन्सीच्या आवारात हे छापे टाकण्यात आले.

चालू वर्षात एप्रिल २०२३ ते ऑक्टोबर २०२३ या कालावधीत दलालीच्या २६९ गुन्ह्यांची नोंद करण्यात येऊन आतापर्यंत ३१७ जणांना रेल्वे कायद्याच्या कलम १४३ अंतर्गत अटक करण्यात आली

### सहा महिन्यांत ३१७ जणांना अटक



असून त्यांना ३.४२ लाख रुपये दंड वसूल करण्यात आला. या २६९ प्रकरणांपैकी २३ एप्रिल ते ऑक्टोबर २०२३ या चालू वर्षात एकट्या मुंबई विभागात दलालीचे ९७ गुन्हे दाखल झाले असून आतापर्यंत ११७ जणांना अटक करण्यात आली आहे. त्यापाठोपाठ भुसावळ विभागात ७२ गुन्हे दाखल झाले असून ७७ जणांना अवैध धंदेप्रकरणी अटक करण्यात आली आहे. पुणे विभागातील आरपीएफने ५६ गुन्हे दाखल करून ७४ जणांना अटक केली, नागपूर विभागात ३६ गुन्ह्यांसह ४१ जणांना अटक, सोलापूर विभागात आठ गुन्हे दाखल करून आठ जणांना अटक करण्यात आली.

मध्य रेल्वेचे आरपीएफ आयटी सेल आणि कौशल्य विकास केंद्र प्रबळ आणि इतर सारख्या विविध सॉफ्टवेअरने सुसज्ज आहे जे ई-टाउटिंग तपास, सायबरस्पेस पाळत ठेवणे, सीसीटीव्ही मॉनिटरिंग इ. मध्ये सहाय्य प्रदान करते. मागील वर्षाच्या याच कालावधीत आरपीएफने दलालीच्या १७८ प्रकरणांची नोंद केली होती आणि २०८ जणांना अटक करून ६.६४ लाख रुपये दंड वसूल केला.

### प्रवाशांना आवाहन

*मध्य रेल्वेने प्रवाशांना वैध रेल्वे तिकिटांसह प्रवास करण्याचे आवाहन करीत आहे आणि ऑनलाईन ई-तिकीटिंगमध्ये गुंतलेल्या दलालांकडून तिकीट खरेदी करू नये कारण ते अशा तिकीटावर प्रवास करू शकत नाहीत तसेच कायदेशीर कारवाईमुळे तिकीट अवरोधित केल्यास त्यांच्या पैशांचे नुकसान होऊ शकते.*

# खासदार श्रीकांत शिंदेंनी इर्शाळवाडीत चिमुकल्यांसोबत साजरी केली दिवाळी





**चौक, खोपोली : प्रतिनिधी**

इर्शाळवाडीच्या चिमुकल्यांना घेऊन आजची दिवाळी साजरी करताना ही आठवण मनाच्या कोपऱ्यात कायमची बसून राहील, या दुर्घटनाग्रस्तांना अनेकांनी मदत केली, पण स्थानिक पातळीवर स्थानिक प्रशासनाने केलेल्या कार्याबद्दल त्यांचे कौतुक करणे आवश्यक आहे, असे उद्‌गार खासदार श्रीकांत शिंदे यांनी काढले.

खासदार श्रीकांत शिंदे फाऊंडेशन यांच्या वतीने इरसाल वाडीच्या कंटेनर हाऊस येथे दिवाळी सणाच्या निमित्ताने खासदार श्रीकांत शिंदे यांनी इर्शाळवाडी येथे येऊन चिमुकले आणि दुर्घटनाग्रस्त यांच्या सोबत फराळ खाऊन व फटाके वाजवून दिवाळी साजरी केली. त्यावेळी खासदार श्रीकांत शिंदे बोलत होते.

१९ जुलै २०२३च्या रात्री इर्शाळवाडीची भयानक व दुर्दैवी घटना घडली. ज्यात ८४ जणांचा मृत्यू झाला. त्यानंतर मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार चौक हद्दीतील एका पेट्रोल पंपावर कंटेनर हाऊस मध्य त्यांची राहण्याची सोय करण्यात आली. राज्य सरकार यांच्याबरोबर खासदार श्रीकांत शिंदे फाऊंडेशन यांनीही दुर्घटना ग्रस्त यांच्या पालकत्वाची जबाबदारी स्वीकारून मदतीचे काम सुरु केले. या वेळी खासदार श्रीकांत शिंदे फाऊंडेशन यांच्या वतीने सर्वांना दिवाळी फराळ, भेटवस्तू, कपडे, फटाके देण्यात आले.

खासदार श्रीकांत शिंदे फाऊंडेशन यांच्या वतीने ४२ कुटुंबांना आर्थिक मदत देण्यात आली. अनेक मान्यवर व संस्था यांनी दिवाळी भेटवस्तू आणल्या होत्या, त्यांचेही वाटप खासदार श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. माजी आमदार देवेंद्र साटम व आमदार महेंद्र थोरवे यांचेही मनोगत झाले. कार्यक्रमास विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, रायगड पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष अधिकारी मंगेश चिवटे, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी अहिरराव, प्रांत अधिकारी अजित नैराळे,तहसीलदार आयुब तांबोळी, चौक सरपंच रितु ठोंबरे, नगरसेविका सुप्रिया साळुंखे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# मनाप्रमाणे करिअरच्या प्रयत्नात अलिबागच्या दोन तरुणींची फसगत

**अलिबाग : प्रतिनिधी**

परदेशात शिक्षणाची संधी देतो तसेच परेदशात नोकरी मिळवून देतो या प्रलोभनाला बळी पडून सोशल मिडीयावर ओळख झालेल्या अनोळखी व्यक्तीकडे निघून गेलेल्या अलिबागमधील दोन तरुणींना रायगड पोलिसांच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने (एलसीबी) गुजरातमधून परत आणले आहे.

अलिबाग येथील १९ वर्षीय वयाच्या दोन तरुणी घरातून निघून गेल्याबाबतच्या तक्रार अलिबाग पोलीस ठाण्यात ६ नोव्हेंबर रोजी देण्यात आली होती. दोन्ही तरुणी कॉलेज मधील मैत्रिणी असल्याचे पोलिसांना समजले. मै यहा से जा रही हूक्यूकी मुझे मेरा ड्रिम कॉलेज मे अॅडमीशन मिल गया हैमुझे ढुंडने की कोशीश मत करणा मै कॅनडा जा रही हू जॉर्ज ब्राऊन कॉलेज ये मेरा ड्रीमकॉलेज है मै वापस तभी आऊँगी जब मेरा कोर्स पुरा हो जायेगा स्कोलरशिप के वजहेसे मेरे रेहने का और जो भी खर्चा होगा वो पुरा कॉलेज उठायेगी असे चिट्ठीत लिहून ठेवले होते.

तांत्रिक माहितीच्या आधारे शोध घेतला असता त्या गुजरात राज्यात गेल्याचे समजले. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा रायगड अलिबागचे एक पथक गुजरात राज्यात जावून दोंन्ही मुलींचा शोध घेतला असता त्या दोंन्ही मुली गुजरात येथे मिळून आल्या. त्याच्याकडे चौकशी केली असता त्यांच्याकडून असे समजले की, त्यांनी मोबाईल मध्ये माईनक्राफ हा ऑनलाईन गेम डाउनलोड केला होता. तो त्या नेहमी खेळत असत. माईनक्राफ हा गेम खेळत असताना त्यामध्ये अफजल फारूकमिया मलीक याचे सोबत त्यांची ओळख झाली होती. त्या ऑनलाईन गेममध्ये बोलत होत्या. त्यानंतर काही दिवसांनी त्यांची चांगली मैत्री झाली. अफजल फारूकमिया मलीक याने त्यांना सांगितले होते की, त्याला डोळ्यांनी खुप कमी दिसते, त्याच्या घरची परीस्थीती हालाकीची आहे. तसेच तो युटयूबर, माईनक्राफ मॉड क्रीयेटर, पोकीट एफ.एम. रायटर आहे. त्याबाबतचे अॅड तो इंन्स्टाग्रावर टाकतो.

दोन्ही मुली इन्स्टाग्रामवर चॅटींग व व्हाईस कॉलवर त्याच्यासोबत बोलत होत्या. त्या अफजलला प्रत्यक्षात कधीही भेटल्या नाही, परंतु त्या इन्स्टाग्रामवर नेहमी चॅटींग व व्हीडीओ कॉल करत होत्या. परीक्षेत कमी मार्क मिळाले की, घरी आई वडील अभ्यासावरून ओरडतात व दबाव आणतात. त्यांना त्याच्या मनाप्रमाणे करीयर करून देत नाहीत. म्हणून त्या दोघींनी एक महिन्यापुर्वीपासून घर सोडून जाण्याचे ठरविले होते. त्याबाबत त्यांनी अफजल यास आम्ही गुजरात येथे येतो असे सांगितले होते.

> **युवा पिढीने सोशल मीडियावरील कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये. कोणताही निर्णय घेताना पालकांना विश्वासात घ्यावे.**
>
> **-सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक, रायगड**

७ व ८ नोव्हेंबर रोजी त्यांनी अफजलला सोबत घेवून जॉब व राहण्यासाठी रूम शोधल्या, परंतु त्यांना रूम व जॉब मिळाला नाही. म्हणून नाईलाजाने त्या अफजल याचे घरी त्याचे आई वडीलांसोबत राहील्या. तेथेच त्यांनी जेवण वगैरे केले. ९ नोव्हेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखाकडील पथक त्यांचा शोध घेत अफजल याचे घरी पोहचले व त्यांना ताब्यात घेऊन सुखरूप अलिबाग येथे घेऊन आले आहेत.

रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे आणि अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा रायगडचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे, अलिबाग पोलीस ठाण्याचे निरिक्षक शिरीष पवार, स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक निरीक्षक नागेश कदम, हवालदार प्रतिक पाटील, आंबेतकर, राकेश म्हात्रे यांच्या पथकाने गुजरात येथून या दोन तरुणींना अलिबाग येथे सुखरूप आणले.

# पशुसंवर्धन विभागांतर्गत योजनांसाठी अर्जाचे आवाहन

**रायगड : प्रतिनिधी**

राज्याच्या ग्रामीण भागातील सुशिक्षित व बेरोजगार युवकासह पशुपालक व शेतकरी बांधवाना स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करून देत, त्यांना शाश्वत अर्थाजनाचा पर्याय उपलब्ध करून देणाऱ्या पशुसंवर्धन विभागाने विविध योजना व उपक्रमांद्वारे ग्रामीण महाराष्ट्राचे अर्थचक्र गतिमान ठेवण्याचा नेहमीच प्रयत्न केला आहे.

विविध योजना व उपक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील पशुपालक/ शेतकरी बांधवांना स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी कटिबध्द असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने वैयक्तिक लाभाच्या योजनांतर्गत प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण योजनेमध्ये गेली चार वर्षे ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविणे व लाभार्थी निवड करण्याची पध्दत सुरू करण्यात आली आहे. सन २०२१-२२ पासून जिल्हास्तरीय विविध योजनांसाठी सुद्धा सदर संगणक प्रणाली लागू करण्यात आली आहे.

यामध्ये शासनाने एखाद्या योजनेकरिता अर्ज केल्यानंतर त्यास दरवर्षी पुन्हा अर्ज करावे लागू नये यासाठी तयार केलेली प्रतिक्षायादी सन २०२१-२२ पासून पुढील पाच वर्षापर्यंत म्हणजे सन २०२५-२६ पर्यंत लागू ठेवण्याची सोय केली आहे.



त्यामुळे अर्ज केलेल्या पशुपालकांना लाभ मिळण्याची शक्यता वाढली असून, त्याची प्रतिक्षा यादीतील क्रमांकानुसार अंदाजे केव्हा लाभ मिळेल हे कळु शकल्यामुळे लाभार्थी हिस्सा भरणे किवा इतर बाबींकरिता नियोजन करता येणे शक्य होणार आहे.

स्थानुसार नाविन्यपूर्ण राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजनेंतर्गत दुधाळ गाई- म्हशींचे गट वाटप करणे, शेळी-मेंढी गट वाटप करणे, १००० मांसल कुक्कुट पक्षांच्या संगोपनासाठी निवारा शेड उभारणीस अर्थसहाय्य देणे, १०० कुक्कुट पिलांचे वाटप व २५ + ३ तलंगा गट वाटप या योजनांसाठी ऑनलाईन पध्दतीने लाभार्थी निवड प्रक्रिया सन २०२३-२४ या वर्षात राबविली जाणार आहे. पशुपालकांना डेअरी, पोल्ट्री किंवा शेळीपालन यापैकी ज्या बाबींमध्ये अर्ज करावयाचा आहे त्याची निवड करण्यची सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्यातील पशुपालक/ शेतकरी बांधव, सुशिक्षीत बेरोजगार युवक / युवती व महिलांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज दाखल करण्याचे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात येत आहे.

ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी संकेतस्थळ :- https://ah.mahabms.com, अँड्रॉईड मोबाईल अॅप्लिकेशनचे नाव : AH.MAHABMS (Google play स्टोरवरील मोबाईल अॅपवर उपलब्ध, अर्ज करण्याचा कालावधी : ०९/११/२०२३ ते ०८/१२/२०२३, टोल फ्री क्रमांक :१९६२ किंवा १८००-२३३-०४१८. योजनांची संपूर्ण माहिति तसेच अर्ज करण्याची पध्दती याबाबतचा संपूर्ण तपशील या संकेतस्थळावर तसेच मोबाईल अॅपवर उपलब्ध आहे.

> **योजनेबाबत अधिक माहितीसाठी वरील तक्त्यात दर्शविलेल्या टोल फ्री क्रमांकावर किंवा तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी अथवा उपआयुक्त कार्यालय, तालुका लघुपशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय अथवा नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्रावर संपर्क साधावा.**
>
> **-डॉ. सचिन देशपांडे, जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन**



**श्रीवर्धन : छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या रायगड भूमीत दिवाळीत किल्ले बनविण्याची मोठी परंपरा आहे. बोर्ली पंचतन येथील कलाकार विनायक पयेर यांच्या अंगणात किल्ले राजगडाची साकारलेली प्रतिकृती लक्षवेधून घेणारी आहे. शिवप्रताप ग्रुपचे विनायक पयेर, साहिल गाणेकर, सुजल पयेर, प्रणित मुद्राळे, स्मित पयेर, सनी पयेर यांनी हा किल्ला साकारला आहे.**

(छाया : अमेय नाझरे)

# माथेरानमध्ये पर्यावरणपूरक दिवाळी साजरी

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील असलेल्या माथेरानमध्ये गिरिस्थान नगरपालिकेकडून फटाक्यांवर निर्बंध आणले आहेत. १२५ डेसिबलपेक्षा जास्त आवाजाच्या फटक्यांची विक्री होत असल्याचे आढळल्यास संबंधित दुकानदारांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे पालिकेकडून सांगण्यात आले.

सह्याद्रीच्या डोंगरावर बसलेल्या माथेरानमध्ये घनदाट वृक्षराजी आहेत. त्यामुळे जंगली पशूही मोठ्या प्रमाणात आहेत. दिवाळीमध्ये पर्यटकांसह स्थानिकही फटाक्यांची आतषबाजी करतात. सरकारच्या अधिसूचनेनुसार, १२५ डेसिबलपेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची विक्री आणि वापर करण्यास मनाई करण्यात आली आहे. याचे तंतोतंत पालन माथेरान नगरपालिकडून करण्यात येत आहे. पालिकेकडून फटाके विक्री करणाऱ्या सर्व दुकानदारांना पर्यावरणपूरक दीपावली साजरी करण्याच्या दृष्टिने सूचित करण्यात आले आहे. फटाक्यांचा आवाज तसेच विषारी वायूमुळे वनस्पती व प्राण्यांवर परिणाम होत असल्याने माथेराप्रानमध्ये निर्बंध लादण्यात आले आहेत. माथेरान नगरपालिकेचे मुख्याधिकारी वैभव गारवे यांनी पर्यावरणपूरक दीपावली साजरी करून शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्याचे आवाहन नागरिकांना केले आहे.



### आवाहनाला चांगला प्रतिसाद

*माथेरानमध्ये पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करावी, असे आवाहन नगरपालिकेकडून करण्यात आले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत शहरातील दुकानदारांनी फटाक्यांची दुकाने लावली नाहीत. पर्यटकांच्या साक्षीने पर्यावरणपूरक दीपावली साजरी करण्याचा संकल्प यंदा दुकानदारांनी केला आहे.*


# मुरूडमधील दत्त मंदिराच्या कामास सुरुवात

## आमदार दळवी यांच्या प्रयत्नाने मिळाला निधी

**मुरूड : प्रतिनिधी**

सुप्रसिद्ध पुरातन श्री दत्त मंदिर व परिसर सुशोभीकरणासाठी अलिबाग मुरूड विधानसभा क्षेत्राचे आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नामुळे सुमारे तीन कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी या कामासाठी तातडीने निविदा प्रक्रिया पूर्ण केल्याने सध्या या मंदिराच्या कामास सुरुवात झाली आहे.

मुरूड शहरातील डोंगरावर वसलेले श्री दत्त मंदिर हे सर्वांचे प्रेरणा स्थान असून या मंदिराच्या कामासाठी श्री दत्त देवस्थान ट्रस्ट मंडळ यांनी आमदार महेंद्र दळवी यांच्याकडे लेखी निवेदन देऊन मंदिर कामासाठी निधीची मागणी केली होती. त्याप्रमाणे आमदार यांनी या मंदिराच्या विकासासाठी तीन कोटी रुपये निधी मिळवून दिला होता.



या मंदिराचा स्लॅब गळती झाल्याने पावसात सर्व पाणी भिंतीद्वारे मुख्य प्रांगणात पाणी येत होते. सर्वप्रथम या मंदिराचा स्लॅब तोडून तो नव्याने करण्यात येत आहे. त्यासाठी असणारा स्लॅब तोडण्यात आला आहे. त्याचप्रमाणे मंदिराच्या सभोवताली असणारा परिसर सुशोभीकरणसुद्धा करण्यात येणार आहे. आवश्यक तिथे संरक्षक भिंत सुद्धा बांधण्यात येणार आहे.

RAYAT SHIKSHAN SANSTHA'S
KARMAVEER BHAURAO PATIL COLLEGE, VASHI
NAVI MUMBAI
Sector 15-A, Vashi, Navi Mumbai.
E-mail : principal@kbpcollegevashi.edu.in

**NOTICE INVITING E-TENDER**

Rayat Shikshan Sanstha's Karmaveer Bhaurao Patil College, Vashi, Navi Mumbai invites e-tender for civil work from reputed contractors, to participate in the competitive bidding process. Details of tender available on web site **https://www.kbpcollegevashi.edu.in/**

**PRINCIPAL**
**Karmaveer Bhaurao Patil College, Vashi.**
**Navi Mumbai**

MAHATRANSCO

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-33/23-24 | Height raising at road crossing Loc. No. 638 to 639 of 220 kV Apta - TaloJa - Kalwa D/C line in Taloja MIDC area under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs. 26.30 Lakhs |

**EMD 1% of estimated cost, Submission of bids from 10.11.2023 to 17.11.2023 at 11:00 hrs, Opening date: 17.11.2023 at 11:30 Hrs. Tender Fee- Rs. 500/-+ GST** each tender. For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: The Executive Engineer(Adm) **Tel No. 022-27459624**, Mob. No. **9769006131**. E-mail ID se7200@mahatransco.in

**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

# शेतमजुरांची टंचाई; बळीराजा चिंतातूर





**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात भात कापणीला जोरदार सुरुवात झाली असून, भात कापणी अंतिम टप्प्यात आली आहे, मात्र तरीदेखील अजून सर्वत्र शेतमजुरांची टंचाई भासत असल्याने शेतकरी चिंतातूर झाला आहे.

निसर्गचक्राचे बिघडलेले संतुलन आणि अवकाळी पडणारा पाऊस ही भीती शेतकऱ्यांच्या मनात आहेच. अशातच हातातोंडाशी आलेला घास हिरावून जाऊ नये म्हणून, शेतकऱ्यांची भात कापणीची धावपळ सुरू आहे, परंतु भात कापणीकरीता वेळीच मजूर मिळत नसल्यामुळे येथील शेतकरी हवालदील झाला आहे. दरम्यान, नाईलाजाने शेतकरी, आपल्याच कुटुंबातील नातेवाईकांच्या मदतीने शेतात भात कापणी करताना दिसत आहेत. उरण तालुक्यात चिरनेर विभागात

## भात कापणी अंतिम टप्प्यात

अनेक ठिकाणी आदिवासी मजुरांचा वापर मोठ्या प्रमाणात होताना दिसत आहे. एकेकाळी भात कापणी झाल्यानंतर पिकाची कडवे चार दिवस चांगली वाळल्यानंतरच त्याचे भारे बांधून उडव्यात रचून ठेवले जात असत. त्यानंतर शेतातच खळा तयार करून त्याचे व्यवस्थित शेनाने सारवण करून, त्यानंतर त्या खळ्यावर मळणीची प्रक्रिया केली जात होती.

सध्याच्या लहरी पावसाच्या भीतीने वर्षभर केलेले कष्ट व त्यासाठी केलेला अमाप खर्च वाया जाऊ नये म्हणून शेतकरी पिके न वाळवताच आणि त्याची साठवणूक न करताच ताबडतोब कापलेले भात पीक झोडून भात घरी आणत आहेत.

उरण तालुका भाताचे कोठार समजले जात होते, परंतु मागील काही वर्षापासून शेती व शेतकऱ्यांचे वेगवेगळ्या माध्यमातून नुकसान होत असल्याने, तसेच येथील औद्योगीकरणामुळे शेतीतील उत्पादनावर हमखास गदा येताना दिसत आहे. पूर्वी इतके भाताचे शेतीतून विक्रमी उत्पादन होत नाही. त्यात भातशेती ही पूर्णतः पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने शेतकऱ्यांना कधी ओला दुष्काळ तर कधी सुक्या दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे तालुक्यात अनेक ठिकाणी जमिनी लागवडी खाली न आणता त्या ओसाड ठेवल्या आहेत. त्यामुळे या भागात शेतीकडे दुर्लक्ष झालेले दिसत आहे.

### अडचणी दूर करण्याची शेतकऱ्यांची मागणी

*ज्या मूठभर शेतकऱ्यांनी भातशेतीची लागवड केली आहे. अशाही शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी मजूर उपलब्ध होत नसल्यामुळे येथील शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यातच जंगल भागात असणाऱ्या भात शेतीवर रानडुकरांची वक्रदृष्टी वळली असल्याने, भातशेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ लागले आहे. शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास कळपाने पिकावर हल्ला करणारी रानडुकरे हिरावून नेत असल्याने, रानडुकरांचा वनविभागाकडून, बंदोबस्त करावा, अशी मागणी उरण परिसरातील शेतकरी वर्गातून होत आहे.*

# नवी मुंबईतील ज्येष्ठ नागरिकांना दिवाळी भेट

## आजपासून एनएमएमटीचा प्रवास मोफत

**नवी मुंबई : बातमीदार**

ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करणारे शहर ही नवी मुंबईची ओळख असून आता नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील रहिवाशी असलेल्या ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना एनएमएमटी बसमध्ये मोफत प्रवासाची सुविधा १३ नोव्हेंबरपासून उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे जाहीर करीत नवी मुंबईकर ज्येष्ठांना दिवाळी भेट देण्यात आलेली आहे.

नवी मुंबईकर प्रवाशांना समाधानकारक सेवा पुरविणारा उपक्रम म्हणून नवी मुंबईकरांची नेहमीच एनएमएमटी प्रवासाला पसंती लाभली असून नमुंमपा परिवहन उपक्रमाच्या ताफ्यातील २०५ डिझेलवर चालणाऱ्या, ८५ सी.एन.जी. वर चालणाऱ्या तसेच ५६ वातानुकूलीत व्होल्वो आणि १९५ वातानुकूलीत इलेक्ट्रीक अशा एकूण ५४१ बसेस आहेत.

नमुंमपा परिवहन उपक्रमामार्फत नवी मुंबई महापालिका हद्दीत व हद्दीबाहेर मुंबई, बोरिवली, ठाणे, भिवंडी, डोंबिवली, कल्याण, अंबरनाथ, बदलापूर, पनवेल, खोपोली,



कर्जत, रसायनी आणि उरण या भागात ४३ सर्वसाधारण व ३२ वातानुकुलीत अशा एकूण ७५ बस मार्गांवर प्रवाशी सेवा देण्यात येत आहे.

सद्यस्थितीत परिवहन उपक्रमाच्या बसेसमधून प्रवास करणाऱ्या नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील ६५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांचा आदर करीत त्यांना बस प्रवास शुल्कात ५० टक्के सवलत दिली जात आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत (एसटी) भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांना १७ मार्च २०२३ पासून बसमध्ये मोफत प्रवासाची सवलत देण्यात येत आहे. त्याच धर्तीवर नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमाच्या बसेसमध्ये वयाची ६५ वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांना सुध्दा मोफत प्रवासाची सवलत देण्यात यावी, अशी मागणी नमुंमपा क्षेत्रातील ज्येष्ठ नागरिक व लोकप्रतिनिधी यांचेकडून सातत्याने केली जात होती. याबाबत सकारात्मक विचार करून नमुंमपा आयुक्त श्री. राजेश नार्वेकर यांनी दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर १३ नोव्हेंबर २०२३ पासून नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील रहिवाशी असणाऱ्या ६५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना सर्व प्रकारच्या एनएमएमटी बसचा प्रवास मोफत असेल असे जाहीर केले आहे.

ज्येष्ठ नागरिकांप्रती असलेली आपुलकीची आणि आदराची भावना अभिव्यक्त करीत ऐन दिवाळीमध्ये ६५ वर्षावरील नवी मुंबईकर ज्येष्ठ नागरिकांना मोफत एनएमएमटी प्रवासाची दिवाळी भेट देण्याचा घेतलेला हा ऐतिहासिक निर्णय महापालिकेची लोककल्याणकारी प्रतिमा उजळविणारी असून या निर्णयाबद्दल आयुक्त राजेश नार्वेकर आणि नमुंमपा परिवहन उपक्रमाचे ज्येष्ठ नागरिकांसह सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# बहिरीनाथाच्या आगमनाने जल्लोष

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मासळीसाठी प्रसिद्ध असलेल्या दिवाळे गावातील दिवाळीच्या निमित्ताने होणारा बहिरीनाथाचा उत्सवदेखील तितकाच प्रसिद्ध आहे. रविवार (दि. १२)पासून तीन दिवस चालणाऱ्या उत्सवाला नवी मुंबईसह इतर ही ठिकाणचे भाविक आवर्जून दर्शनाला येतात. त्यामुळे समुद्राने तीनही बाजूंनी वेढलेल्या बेलापूरच्या कुशीत असणाऱ्या दिवाळे गावाने या उत्सवातून 'गावपण' जपले आहे.

नवी मुंबईतील दिवाळे गाव मासळीसाठी प्रसिद्ध आहे, मात्र या गावातील दिवाळीतील बहिरीनाथाचा आगमन सोहळा पंचक्रोशीत प्रसिद्ध आहे. या उत्सवाच्या वेळी वर्षभर



समुद्रात राहणारा लाडका देव गावात येत असल्याने उत्साहाचे वातावरण पसरलेले असते. अशातच एकीकडे दिवाळीची धामधूम; तर दुसरीकडे बहिरीनाथ देवाचा तीन दिवस चालणाऱ्या उत्सवात नवस बोलण्यासाठी नवी मुंबई, मुंबई, पनवेल, ठाणे येथून हजारो भाविक मोठ्या संख्येने उपस्थिती लावतात. विशेष म्हणजे, घारापुरी बेटाजवळील समुद्रातील बहिरीदेवाची मूर्ती शोधून होडीने दिवाळे गावात आणण्याची प्रथा २५० वर्षांहून जुनी असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. आजही नरक चतुर्दशीच्या दिवशी गावातील ३०० हून अधिक तरुण ३५ ते ४० होड्या घेऊन देवाला आणायला घारापुरी बेटाजवळील समुद्रात जातात.

**देवाला दिवाळी फराळासोबत नवस केलेल्या विविध वस्तू अर्पण केल्या जातात. त्यानंतर दुपारी देवाला पालखीत बसवून वाजत-गाजत बंदरातील होडीत बसवून गावकरी भक्तिभावाने बहिरीनाथाला निरोप देतात.**
**-हेमंत कोळी, ग्रामस्थ**



**पनवेल : भारतीय जनता पक्ष महिला मोर्चा उलवे नोड अध्यक्ष योगिता सुहास भगत यांच्या नवीन गाडीचे पूजन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे भगत कुटुंबीयांकडून स्वागत करण्यात आले. सोबत गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत उपस्थित होते.**

# आयुर्वेदिक दिवाळी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दीपोत्सव म्हणजे केवळ आकाश दिवा लावणे, पणत्या पेटवणे आणि फटाके फोडणे, फराळ खाणे असे नाही. या पाचही दिवसांत ज्या वस्तू पूजेमध्ये वापरल्या जातात, त्याचे आयुर्वेदिक मोठे महत्त्व आहे. आयुर्वेदिक असल्यानेच त्यांना पूजेच्या प्रसाद स्वरूपात खाण्यास सांगितले जाते.

धनत्रयोदशी, लक्ष्मीपूजन या दिवशी पूजामध्ये चणे, मुरुडशेंग, बत्तासे, जिरे, गूळ, तीळ, कमळ बीज तसेच अनेक वस्तू वापरल्या जातात. या प्रत्येक जिनसाचे दिनपरत्वे व ऋतुपरत्वे खूप महत्त्व आहे, अशी उपयुक्त माहिती पनवेलमधील आयुर्वेद तज्ज्ञ डॉ. संदेश गावंड यांनी दिली. दिवाळी ही थंडीच्या मोसमात येत असून शरीरामध्ये ऊर्जा निर्माण करणे किंवा शरीराचे रक्षण जिन्नसांच्या सेवनाने होऊ शकतात, असे आयुर्वेदामध्ये म्हटले आहे.

# उरणमधील सामाजिक संस्थांची आदिवासींसोबत दिवाळी

**उरण : बातमीदार**

श्रीमंत व मध्यमवर्गीय आपापल्या परीने आपल्या मुलांसमवेत दिवाळी आनंदात साजरी करत असतात, मात्र दुर्गम भागात राहात असणाऱ्या आदिवासी बांधवांच्या मुलांना दिवाळी आनंदात साजरी व्हावी या उद्देशाने उरण तालुक्यातील वी क्लब ऑफ द्रोणागिरी, स्व. तृप्ती सुधीर सुर्वे फाऊंडेशन उरण व माई फॉउंडेशन उरण यांच्या संयुक्त विद्यमाने पुनाडे आदिवासी वाडीतील सर्व मुलांना पुस्तक, कपडे, फराळ, फटाके व चॉकलेट वाटप करण्यात आले.



या वेळी स्व. तृप्ती सुधीर सुर्वे फाऊंडेशनच्या उपाध्यक्षा कल्पना सुर्वे यांनी आपल्या संस्थेच्या माध्यमातून करत असलेल्या उपक्रमाविषयी माहिती देऊन भविष्यात आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उपक्रमास हातभार लावून या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला जाईल अशी भावना व्यक्त केली.

या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र युवा प्रतिष्ठान पाणदिवेचे संस्थापक अध्यक्ष राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते मनोज पाटील,वी क्लब ऑफ द्रोणागिरीच्या अध्यक्षा, माई फॉउंडेशनच्या अध्यक्षा श्लोक पाटील, कल्पना सुर्वे, आरती ढोले, गायत्री माळी, सोनाली वर्मा, नम्रता पाटील, सृष्टी शिंदे, पुनाडे वाडीचे प्रभारी मुख्याध्यापक प्रमोद नवाळे, विशाल म्हात्रे आदी उपस्थित होते.

# आदिवासी पाड्यात दिवाळी साजरी

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

खारघरमधील घोळवाडी या आदिवासी पाड्यात आदर्श सेवाभावी सामाजिक संस्थेच्या वतीने साडीचोळी, मिठाई, फराळ आणि मिठाई वाटप करून दिवाळी साजरी करण्यात आली.

या वेळी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिमंडळ दोनचे उपायुक्त पंकज डहाने, बँक ऑफ मॉरिशसचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत कदम, ज्येष्ठ पत्रकार विश्वरथ नायर, नवी मुंबई पालिका समाज विकास विभागाचे समाजसेवक दशरथ गंभीरे, सामाजिक कार्यकर्ते गणेश पेडामकर, मेघनाथ ठाकूर, मनेश पाटील, शिक्षक दीपक शिंदे, सामाजिक कार्यकर्त्या संध्या जैन आदी उपस्थित होते.

दिवाळीचा सण घराघरात आनंदात साजरा केला जातो, मात्र आदिवासी पाडे, गरजू, गरीब व्यक्ती या सणाच्या आनंदापासून वंचित राहतात. अशा वंचितांनाही या सणाचा आनंद लुटता यावा, या उद्देशाने आदर्श सेवा भावी सामाजिक संस्थेकडून महिलांना साडी चोळी, फराळ आणि



मिठाई वाटप करून दिवाळी साजरी करण्यात आली. या वेळी पोलीस उपायुक्त पंकज डहाणे, ज्येष्ठ पत्रकार विश्वरथ नायर, बँक ऑफ मॉरिशसचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत कदम आदींनी या उपक्रमाचे कौतुक केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कुणाल ठाकूर, प्रथमस पेडामकर, निरंजन कदम, ऋषिकेश शेलार, लक्ष्मण ठाकूर, विलास कातकरी, गजानन चव्हाण आदींनी मेहनत घेतली.

# दिवाळीत किल्ला बनविण्यात बच्चेकंपनी मग्न

**नवी मुंबई : बातमीदार**

रांगोळी, कंदील, फटाके, फराळ अशा सर्व गोष्टींप्रमाणेच दिवाळीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे किल्ले. जसे फराळ, फटाके, पणत्या, आकाशकंदील डोळ्यांपुढे येतात, तसेच अंगणातील किल्लाही आठवतो. पण, दिवाळीच्या सुट्टीत घराच्या आवारात महाराष्ट्रातील विविध किल्ल्यांची प्रतिकृती उभारण्याच्या जुन्या परंपरेकडे सध्याच्या 'स्मार्टफोन' युगात ओढ कमी झाली आहे. लहानांच्या विश्वातला आणि मोठ्यांच्या आठवणीतला असा हा दिवाळीचा किल्ला!

दिवाळी आली की कपडे, फटाके, आकाशकंदील खरेदी करायची लगबग सुरू होते. तर बहुतांश ठिकाणी लहान मुलांची किल्ला बनवायची तयारी असते.



थोडक्यात काय तर आपल्या इतिहासातील अनेक सुवर्णक्षण, अनेक मोहिमा, आनंदाचे दुःखाचे क्षण, पराभव- विजय, पराक्रम, आक्रमण यांचे हे किल्ले साक्षीदार आहे. गावाकडे प्रामुख्याने दगड, माती, शेण, चिकट धान्याचे पीठ अशा गोष्टी एकत्र करून एखाद्या किल्ल्याची प्रतिकृती तयार केली जाते. गावात काही जण हे किल्ला बांधणी करतात. तर काही साहित्य आणण्याचे काम करतात. पुढे मग किल्ला बांधणी झाली की, गेरू चुना वापरून किल्ल्याची रंगरंगोटी केली जाते.

या वेळी, गुंजा, करडई अशा धान्यांनी नक्षीकाम केल्या जाते. मग किल्ल्यावर ध्वज लावले जातात. मूर्ती ठेवल्या जातात. झेंडूच्या झाडाचे तोरण लावले जाते. संध्याकाळी दिवे लावून किल्ल्यावर रोषणाई केली जाते. हा झाला गावातील किल्ला, पण शहरात असा किल्ला तयार करायला असंख्य अडथळे येतात. शहरात जागेची कमतरता असते. शेण, माती, दगड कुठून आणायचे हा प्रश्न असतो. त्यावर पर्याय म्हणून बाजारात ढाचा तयार केलेले लाकडी किल्ले किंवा पीओपीचे तयार किल्ले भेटू लागले आहेत. शहरांत अशा किल्ल्यांची मागणीदेखील वाढली आहे. याचं उद्धेशाने दिवाळे गावातील आर्यन गझने, देवांश पाटील, देवर्श गझने, सान्वी कोळी या बच्चे कंपनीने एकत्रित येत दिवाळीच्या सुट्टित ऐतिहासिक किल्ला उभारला असून हा किल्ला पाहण्यासाठी परिसरातील लोकांची गर्दी होत आहे.

दरम्यान, आजूबाजूला पडलेले दगड, लाल माती, प्लॅस्टिकच मावळे, सैनिक, प्राणी, सिंहासन, झाडे अशी सामग्री आधी जमवावी लागेल. गडकिल्ले बनविताना तट, बुरूज, माची, दरवाजे, पायऱ्या, मार्ग, पाण्याची टाकी, मदिरे, दारूगोळ्याचे ठिकाण, डोंगराचे सुळके आणि शिरा आदींचा विचार होणे आवश्यक आहे. नुसता डोंगर उभारून किल्ला बनत नाही. किल्ला तयार करताना तो चहूबाजूंनी तटबंदी तयार करा. सैनिक, मावळे, तोफ, पाण्याचे टाके यांची योजना कल्पकतेने केली की एक चांगला किल्ला तयार होतो, असे मत किसन गजणे यांनी सांगितले.

# बेलापूर विधानसभा शिवसेना संपर्कप्रमुखपदी राजश्री येवले

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा येथील शिंदे गट शिवसेनेच्या राजश्री येवले यांची बेलापुर विधानसभा मतदार संघाच्या संपर्क प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली. उपनेते विजय नाहटा व जिल्हाप्रमुख विजय चौगुले यांनी त्यांना नियुक्ती पत्र दिले.

राजश्री येवले यांनी सानपाडा विभागात महिलांची मोट बांधलेली आहे. राजेश्री येवले या सावली असंघटीत महिला कामगार संघटना/ धिरज पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट संस्थापक अध्यक्षा असून गरजू महिलांसाठी त्या सातत्याने सक्रीय आहेत. महिलांना सातत्याने शासनाच्या योजना व त्याद्वारे मिळणारे फायदे मिळावेत यासाठी त्या प्रयत्नशिल असून तब्बल हजरपेक्षा जास्त महील त्यांच्या संघटनेशी निगडित आहेत. सध्या शिवसेना शिंदे गट आपल्या



पक्षात एक एक कार्यकर्ता जोडत आहे, असे असताना तब्बल शेकडो महिलांची संघटना बाळगून असेल्लेया राजश्री येवले यांच्या कार्याचा शिंदे गटाला नवी मुंबईत फायदा होण्याची शक्यता आहे. ही बाब ओळखून त्यांना बेलापुर विधानसभा मतदार संघाचे संपर्कप्रमुख पद देण्यात आले आहे.

# अवकाळी पावसामुळे कर्जतमध्ये भातपिकाचे नुकसान

## पंचनामे करण्याची शेतकर्‍यांची मागणी; तहसीलदारांना निवेदन

**कर्जत : प्रतिनिधी**

गेले काही दिवस कर्जत तालुक्यात अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे. या पावसाने भातशेतीचे मोठे नुकसान केले आहे. पावसाने नुकसान झालेल्या शेतीचे शासनाने तत्काळ पंचनामे करावेत, अशी मागणी शेतकर्‍यांनी केली आहे.

कर्जत तालुक्यात ८ नोव्हेंबरपासून अवकाळी पावसाने हजेरी लावली. पहिल्या दिवशी संध्याकाळी साडेचार आलेला पाऊस सहापर्यंत सुरू होता. ९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता आलेला अवेळी पाऊस हा रात्री ९पर्यंत आणि रात्री उशिरादेखील सुरू होता, तर १० नोव्हेंबर रोजी दुपारी पावसाने वादळी वार्‍यासह अवेळी पावसास सुरुवात केली. यंदा भाताचे चांगले पीक हातात येण्याची शक्यता असताना सतत अवेळी पाऊस सुरू असल्याने अनेक ठिकाणी भाताचे पीक उभ्या शेतात सडून जाण्याची भीती निर्माण झाली आहे. वादळी वार्‍यासह पाऊस येत असल्याने भाताचे पीक अनेक ठिकाणी शेतात कोसळून पडत आहे, तर दिवाळी सण असताना खरेदी करण्यासाठी बाहेर पडणार्‍या ग्राहकांना पावसाने घराबाहेर पडू दिले नाही. त्यामुळे व्यावसायिकही काहीसे आर्थिक संकटात आले आहेत. भाताच्या शेतीचे होत असलेले नुकसान यामुळे बळीराजा चिंतेत आहेत. भाताचे रोप शेतात अवेळी आलेल्या पावसाच्या पाण्यात भिजत आहे. पावसामुळे खराब होत असलेल्या भाताच्या पिकाची पाहणी करून पंचनामे करण्याची मागणी कर्जत तालुक्यातील शेतकरी करीत आहेत. प्रगतशील शेतकरी वदप येथील विनय वेखंडे यांनी, शेतकर्‍यांचे पिवळे सोने पावसाच्या पाण्यात कुजून जाऊ लागले आहे, असे सांगितले, तर भाताचे पीक घरात नेवून उडवी करून ठेवली होती. त्या उडवीच्या आजूबाजूला पाण्याची डबकी साचली असल्याने भाताचे मोठे नुकसान सुरू आहे, असे कशेळे येथील प्रगतशील शेतकरी उदय पाटील म्हणाले. आम्ही गेली काही दिवस भाताच्या नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी करीत आहोत. सहकार विभागाने भाताच्या नुकसानग्रस्त शेतीचे पंचनामे करावेत, अशी मागणी करणारे निवेदन शेतकर्‍यांच्या वतीने शासनाला देण्यात आले. बारणे येथील प्रगत शेतकरी दशरथ मुने आणि राजनाला कालवा परिसरातील शेतकर्‍यांनी ही मागणी तहसीलदार डॉ. शीतल रसाळ यांना निवेदन देऊन केली.



### महावितरणचेही मोठे नुकसान

*वादळी वार्‍यासह येणार्‍या पावसामुळे भाताच्या शेतीबरोबर महावितरण कंपनीचे विजेचे खांब कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. त्याचा परिणाम तीन दिवस तालुक्यातील अनेक भागात वीज गायब होण्याचा घटना घडल्या आहेत. कशेळे येथील पॉवर हाऊसमधून अंजप अंत्रट, सुगवे खांडस, नांदगावपासून आंबिवली, जांबरुख पोटल पाली, मांडवणे या पट्ट्यातील किमान ५० गावांना विद्युत पुरवठा होतो. ऐन सणासुदीच्या दिवशी वीज खंडित होत असल्याने स्थानिक लोक संतप्त आहेत.*

# दिवाळीनिमित्त वांगणी ग्रामस्थांना साखरवाटप

## भाजप युवा नेते एकनाथ ठाकूर यांचा उपक्रम

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणेजवळील वांगणी गावातील दानशूर व्यक्तिमत्व माजी सरपंच, विद्यमान सदस्य व जनहित कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष भाजप युवा नेते एकनाथ ठाकूर हे प्रत्येक वर्षी दिवाळीला विविध उपक्रम राबवून ग्रामस्थांची दिवाळी गोड करीत असतात. त्याच अनुषंगाने त्यांनी या वर्षी दिवाळीला वांगणी गावातील ग्रामस्थांना प्रत्येकी दोन किलो साखर या प्रमाणे एकूण ४५० किलो साखर वाटप करून ग्रामस्थांची दिवाळी गोड केली.

या वेळी एकनाथ ठाकूर यांच्यासह वांगणी गावाच्या पोलीस पाटील आदिती ठाकूर, शंकर ठाकूर, सुरेश तेलंगे, दिलीप तेलंगे, जितेंद्र दळवी, प्रवीण कदम, सदानंद चव्हाण, अर्जुन ठाकुर, हेमंत चव्हान, भूषण शिद, शेखर शिद, मंगेश मांडे, भाऊ तेलंगे, प्रकाश ठाकूर, सखाराम ठाकूर, कृष्णा ठाकूर आदींसह गावातील महिला, ग्रामस्थ उपस्थित होते.



# आमदार महेश बालदी यांच्या निधीतून वावंढळ येथे विकासकामांचा शुभारंभ

**चौक : प्रतिनिधी**

उरण विधानसभा मतदारसंघाचे कार्यतत्पर आमदार महेश बालदी यांच्या निधीतून वावंढळ येथील कामांना मंजुरी मिळाली असून या कामांचा शुभारंभ भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे यांच्या हस्ते करण्यात आला.

खालापूर तालुक्यातील ग्रामपंचायत वावंढळ हद्दीतील मूळ गाव व कोयना प्रकल्पग्रस्त वसाहतीमधील गटार कामांना मंजुरी मिळाली असून या कामांची शिफारस व पाठपुरावा आमदार महेश बालदी यांनी केला होता. या कामांचा शुभारंभ भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमास सरपंच सुहास कदम, उपसरपंच अमोल कदम, माजी सरपंच दीपक पंदेकर, किसन पवार, सचिन कांबळे, रोशन पंदेकर, मालती जाधव, मोहिनी खरीवळे, मयुरी वधिरे, किशोरी वाळंज, मनीषा चव्हाण, प्रदीप जाधव यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



# भाऊ कदम, कुशल बद्रिके यांच्या हस्ते एम कॅफेचे उद्घाटन



**पाली : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गालगत तिसे ग्रामपंचायत हद्दीत एमसीएल कंपनीतर्फे एम कॅफे उभारण्यात आले आहे. त्याचे उदघाटन प्रसिद्ध मराठी कलाकार व चला हवा येऊ द्या फेम भाऊ कदम आणि कुशल बद्रिके यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास मीरा क्लीन फ़ुयुल कंपनी तसेच एम कॅफे ऑरगॅनिकचे मालक राजेश घोलप, एम कॅफेचे मॅनेजर सन्नी तिवारी, तिसे ग्रूप ग्रामपंचायत सरपंच राकेश कांबळे, उपसरपंच जयेश घावटे, माजी उपसरपंच राजेश कदम, सामाजिक कार्यकर्ते नरेश बिरगावले, तंटामुक्त अध्यक्ष अशोक घावाटे, तेजेश घावटे, उद्योजिका निलम कदम, पोलीस निरीक्षक साबळे, निलेश गोरीवले, प्रफुल्ल घावटे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# ताडी दुकानांचा ४ डिसेंबर रोजी होणार ई-लिलाव

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील ७८ ताडी दुकानांचा सन २०२३-२४ या वर्षातील जाहीर लिलाव (ई-लिलाव निविदा) पद्धतीने ४ डिसेंबर रोजी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर घेण्यात येणार आहे.

या ई-लिलावाच्या अटी व शर्ती तसेच प्रक्रियेबाबत अधिक माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे तसेच अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, रायगड अलिबाग व सर्व विभागीय निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, रायगड अलिबाग यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत.

या ई-लिलावात भाग घेऊ इच्छिणार्‍या सर्व संबंधितानी याबाबत नोंद घ्यावी, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाचे रायगड अधीक्षक आर. आर. कोले यांनी केले आहे.

# स्थानिक दुकानदार व विक्रेत्यांकडून खरेदीचे आवाहन; ग्राहकांचीही पसंती

**पाली : प्रतिनिधी**

दिवाळीला विविध वस्तूंची खरेदीची लगबग सुरू आहे. त्यातच ऑनलाईन खरेदीवर वेगवेगळ्या ऑफर सुरू आहेत, मात्र स्थानिक विक्रेते व दुकानदार यांच्या मेहनतीचे चीज व्हावे व कष्टाला मोबदला मिळून त्यांचीही दिवाळी आनंदात जावी यासाठी सोशल मीडिया व जिल्ह्यातील काही समाजसेवी व्यक्तींकडून स्थानिक विक्रेते, दुकानदार व कारागिरांकडून खरेदी करण्याचे आवाहन केले जात आहे. विशेष म्हणजे अनेकजण स्थानिक बाजरातून खरेदीसाठी पसंती देत आहेत.

जिल्ह्यातील छोटे-मोठे व्यावसायिक, स्थानिक दुकानदार व विक्रेत्यांनी आकाशकंदिल, दिवे, केरसुणी आदींपासून रांगोळी, रंग, फटाके, कपडे असे सर्वकाही विक्रीसाठी ठेवले आहेत. अशावेळी लोकांनी ऑनलाइन किंवा मोठ्या शहरातून वस्तू खरेदी केल्यास छोट्या विक्रेत्यांना व दुकानदारांना तोटा सहन करावा लागतो, कारण त्यांचे भांडवल यासाठी लागले आहे. हे विकून विक्रेत्यांना दोन पैसे मिळणार असतात. शिवाय यातील बराचसा मला हा हंगामी असल्याने त्याची विक्री न झाल्यास तसाच पडून राहतो किंवा खराब होतो. परिणामी स्थानिक विक्रेते व दुकानदाराचे नुकसान होते. त्यामुळेच अनेकांनी स्थानिक बाजारपेठ व विक्रेत्यांकडून खरेदी करण्याचे आवाहन केले आहे. तशा स्वरूपाच्या पोस्टदेखील सोशल मीडियावर फिरत आहेत आणि त्याचा सकारात्मक परिणामसुद्धा होताना दिसत आहे.



### कला अन् कारागिरांना वाव

*जिल्ह्यातील अनेक कारागीर व कलाकार दिवाळीसाठी मातीच्या पणत्या, दिवे, आकाशकंदिल, घरगुती उटणे आदी वस्तू बनवितात व स्थानिक बाजारात विक्रीसाठी ठेवतात. स्थानिक कारागिरांकडून खरेदी केल्यास त्यांच्या कलेला वाव मिळतो व रोजगार उपलब्ध होतो.*

### ऋणानुबंधांचीही जोपासना

*पालीतील दुकानदार मुकुंद कोसुंबकर यांनी सांगितले कीम मागील काही वर्ष ऑनलाइन शॉपिंगचा फटका व्यवसायाला बसला होता, पण आता लोक स्थानिक बाजरातून व दुकानातून खरेदी करणे अधिक पसंत करतात. यामुळे ऋणानुबंधदेखील वाढतात. शिवाय ग्राहकांना चांगली वस्तू योग्य दरात मिळते आणि त्यांच्या तक्रारींचे निवारणदेखील करता येते.*

**दिवाळीनिमित्त स्थानिक कारागीर व कलाकारांनी बनविलेल्या वस्तूंना सध्या पसंती मिळत आहे, मात्र या वस्तू विक्रीसाठी योग्य व कमी भाड्याने जागा उपलब्ध होणे आवश्यक आहे. दिवाळीसारख्या व इतर सणाला स्थानिकांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. त्यातूनच रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. व मेहनतीचे चीज होते.**

**-अभिषेक देशमुख,** आर्टिस्ट, सुधागड

**स्थानिक दुकानदार व विक्रेते यांच्याकडूनच दिवाळीसाठी वस्तू खरेदी करण्याचा कल आहे. त्यामुळे आपल्या लोकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यास मदत होते आणि एक आत्मिक समाधानदेखील लाभते. यामुळे दिवाळीसाठी ऑनलाइन खरेदीपेक्षा स्थानिक बाजारात खरेदी करते.**

**-मेघना निंबाळकर,** गृहिणी, पाली

# कर्जतमध्ये दीपावलीनिमित्त रंगावली प्रदर्शन



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील पाटील आळीत असलेल्या छत्रपती शिवाजी मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही रंगावली प्रदर्शन भरविण्यात आले आहे. मंडळाचे हे चोपन्नावे वर्ष आहे. उदयोन्मुख कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळावे हा मंडळाचा हेतू आहे.

मंडळाच्या सभागृहात आयोजित रंगावली प्रदर्शनाचे उद्घाटन नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या हस्ते झाले. उद्घाटन समारंभास मंडळाचे अध्यक्ष गजानन गुरव, माजी अध्यक्ष दत्तात्रय म्हसे, सचिव अरुण विशे, विठ्ठल जाधव, किशोर शेलार, पंछि गुप्ता, हरिश्चंद्र राऊत, जयवंत म्हसे, राजू मोरे आदी उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत म्हसे यांनी केले.

या वेळी मार्गदर्शनपर मनोगतात सुवर्णा जोशी यांनी कर्जतमधील रंगावली कलाकार पुणे-मुंबईसारख्या मोठ्या शहरांमध्ये जाऊन आपल्या कलेचा ठसा उमटवतात ही कौतुकास्पद बाब आहे. नवोदित रंगवली कलाकार मानसी सुळे हिनेही मनोगत व्यक्त केले. या या वेळी रंगावली कलाकारांचा सत्कार करण्यात आला.

या प्रदर्शनात प्रसिद्ध कलाकार किसन खंडोरी यांनी सिंधुताई सकपाळ, राजेंद्र दगडे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सविता शेलवलेंनी कीर्तनकार बाबामहाराज सातारकर, स्वप्ना पाटील यांनी उद्योगपती रतन टाटा, प्रियांका भासे यांनी आमदार महेंद्र थोरवे, आलिशा जैन यांनी आयुषमान खुराणा, मनोज चव्हाण यांनी लता मंगेशकर व मनोज जरांगे, आशिष गायकवाड यांनी अमिताभ बच्चन, तनहा परदेशी यांनी गौतम बुद्ध, सुनील परदेशी यांनी लावणी कलावंत, कुणाल साळवी यांनी बागेश्वर, तसेच किसन खंडोरी, राजेंद्र दगडे या सुप्रसिद्ध रंगवलीकारांसह मानसी सुळे, सुश्मिता सुळे आदी नवोदित कलाकारांनीही विविध विषयावरील रांगोळ्या साकारून प्रदर्शनात जिवंतपणा आणला आहे. या वळी नितीन गुप्ता, विजय पाटील, दीपक जाधव आदींसह रंगावली कलाकार उपस्थित होते.





**माणगाव : येथील नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार आणि राजेश मेहता यांना दैनिक रामप्रहरचा दिवाळी अंक स्थानिक प्रतिनिधी सलीम शेख यांनी भेट दिला.**

# पाकचा शेवटही ‘कटू’; इंग्लंड विजयी

**कोलकाता : वृत्तसंस्था**

पाकिस्तान आणि इंग्लंड या दोन्ही संघांचा यंदाच्या विश्वचषक स्पर्धेतील प्रवास अखेर संपुष्टात आला. या संघांमध्ये शनिवारी झालेल्या सामन्यात आधीच स्पर्धेबाहेर झालेल्या इंग्लंडने पाकिस्तानवर दणदणीत विजय साकारला. त्यामुळे पाकिस्तान संघही वर्ल्डकपमधून बाद झाला.



इंग्लंडने विजयासाठी ठेवलेले ३३८ धावांचे लक्ष्य ठेवले होते. पाकिस्तानला उपांत्य फेरी गाठण्यासाठी हा सामना ४० चेंडूत जिंकावा लागणार होता, जे की अशक्य काम होते. त्यांनी ६.४ षटकांत पार केले असते तर पाकिस्तान उपांत्य फेरीत पोहोचला असता, मात्र बाबर आझमच्या संघाला पूर्ण षटकातदेखील हा सामना जिंकता आला नाही. इंग्लंडने हा सामना ९३ धावांनी जिंकत ते २०२५ साली पाकिस्तानमध्ये होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीत थेट पात्र झाले आहेत. उपांत्य फेरीत १५ नोव्हेंबरला भारत–न्यूझीलंड (मुंबई) आणि १६ नोव्हेंबरला ऑस्ट्रेलिया–दक्षिण आफ्रिका (कोलकाता) अशा लढती होतील.

एकदिवसीय विश्वचषकाच्या ४४व्या सामन्यात इंग्लंडने पाकिस्तानचा ९३ धावांनी पराभव केला. कोलकात्याच्या ईडन गार्डन्स मैदानावर इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत नऊ गडी गमावून ३३७ धावा केल्या. प्रत्युत्तरात पाकिस्तानचा संघ ४३.३ षटकांत २४४ धावांवर सर्वबाद झाला आणि सामना गमावला. डेव्हिड विलीला सामनावीराचा किताब देण्यात आला.

या सामन्यात इंग्लंडकडून बेन स्टोक्सने ८४, जो रूटने ६० आणि जॉनी बेअरस्टोने ५९ धावा केल्या. डेव्हिड मलानने ३१, हॅरी ब्रूकने ३० आणि जोस बटलरने २७ धावा केल्या. पाकिस्तानकडून हारिस रौफने तीन विकेट्स घेतल्या. शाहीन आफ्रिदी आणि मोहम्मद वसीम ज्युनियर यांना प्रत्येकी दोन गडी बाद करण्यात यश मिळाले. इफ्तिखार अहमदने एक विकेट घेत त्यांना मदत केली.

३३८ धावांचा पाठलाग करताना पाकिस्तान २४४ धावाच करू शकला. आघा सलमानने सर्वाधिक ५१ धावा केल्या. कर्णधार बाबरने ३८, तर रिझवानने ३६ धावा केल्या. शेवटी हारिस रौफने ३५ धावांचे योगदान दिले. इंग्लंडकडून डेव्हिड विलीने तीन विकेट्स घेतल्या. आदिल रशीद, गुस ॲटकिन्सन आणि मोईन अली यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. ख्रिस वोक्सने एक विकेट घेतली.

वर्ल्डकपमध्ये भारत आणि दक्षिण आफ्रिकेनंतर ऑस्ट्रेलिया आणि अखेर न्यूझीलंडने उपांत्य फेरीत धडक मारली आहे. आता १५ नोव्हेंबरला मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर पहिल्या उपांत्य फेरीत भारताचा सामना न्यूझीलंडशी होणार आहे. त्याचवेळी १६ नोव्हेंबरला दुसऱ्या उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियन संघ कोलकात्याच्या ईडन गार्डन्सवर दक्षिण आफ्रिकेशी भिडणार आहे.

# मुंबई विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत ‘सीकेटी’ची चमक





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा संचालनालय पुणे आणि मुंबई उपनगर जिल्हा क्रीडा कार्यालय आयोजित मुंबई विभागीय शालेय बॉक्सिंग स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील कृपाश्री शेट्टी हिने प्रथम क्रमांक, तर सुशील विकी आणि ओम पिसाळ यांनी तृतीय क्रमांक मिळविला.

प्रथम क्रमांक मिळविणारी कृपाश्री शेट्टी हिची अकोला येथे होणाऱ्या राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. याबद्दल तिचे तसेच अन्य विजेत्या खेळाडूंचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ.एस.टी गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# आंतर विभागीय कुस्ती स्पर्धेत रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचे यश





**खारघर : प्रतिनिधी**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयाने खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय येथे मुंबई विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या आंतर विभागीय कुस्ती स्पर्धेत यश संपादन केले आहे.

महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील तृतीय वर्षाचा उमेश पाटील याने ७४ किलो वजन गटामध्ये रौप्यपदक, तर माहिती व तंत्रज्ञान विभागातील द्वितीय वर्षाच्या मेघना जैन हिने कांस्यपदक पटकाविले. या दोघांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक तसेच जिमखाना प्रमुख प्रा.प्रथमेश उदेकर, अजिंक्य भगत फिजिकल डायरेक्टर, इतर सर्व सदस्यांचा या विद्यार्थ्यांच्या यशामध्ये मोलाचा वाटा आहे.

याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ.सिद्धेश्वर गडदे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# जलतरणपटू आर्यन मोडखरकरची राष्ट्रीय स्तरावर निवड

## आंतरशालेय स्पर्धेत द्वितीय क्रमांक



**उरण : वार्ताहर**

राज्य क्रीडा संचालनालयच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या आंतरशालेय क्रीडा स्पर्धेतील जलतरणामध्ये उरणच्या आर्यन विरेश मोडखरकर याने यश मिळवले आहे. आर्यनने पुणे बालेवाडी येथे झालेल्या स्पर्धेत बॅकस्ट्रोक या प्रकारात द्वितीय क्रमांक प्राप्त केला. त्यामुळे त्याने राष्ट्रीय स्पर्धेसाठी स्थान मिळवले आहे. यासह उरणच्या नगर परिषद जलतरण तलावामधून राष्ट्रीय स्तरावर जाण्याचा पहिला मान त्याने मिळवला आहे.

उरणच्या सेंट मेरीज कॉन्व्हेन्ट हायस्कूलमध्ये इयत्ता बारावीत शिकणारा आर्यन उरण नगर परिषदेच्या जलतरण तलावामध्ये सराव करतो. प्रशिक्षक हितेश भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली जलतरणाचे धडे घेणाऱ्या आर्यनने आजवर अनेक बक्षिसे मिळवली आहेत. त्यामुळे त्याची ओळख आंतरराष्ट्रीय जलतरणपटू अशी निर्माण झाली असली तरी आंतरशालेय क्रीडा स्पर्धा महत्त्वाची मानली जात असल्याने या स्पर्धेत सहभाग घेत त्याला राष्ट्रीय स्तरावर आपले स्थान कायम ठेवणे आवश्यक होते. पुणे बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत आर्यनने द्वितीय क्रमांक पटकाविला.

पुढील राष्ट्रीय स्पर्धा राजधानी दिल्ली येथे होणार असून आर्यनच्या कामगिरीमुळे शाळा, शिक्षक, पत्रकार, मित्रपरिवार, नातेवाईक तसेच शुभचिंतकांकडून शुभेच्छांचा आर्यनवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# कबड्डी स्पर्धेत बँक ऑफ बडोदा संघाला दुहेरी विजेतेपद





**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई शहर कबड्डी असोसिएशनने आयोजित केलेल्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत बँक ऑफ बडोदा संघाने दुहेरी विजेतेपद पटकाविले.

पुरुष विशेष व्यावसायिक गटात बँकेने आपला कट्टर प्रतिस्पर्धी भारत पेट्रोलियमला चुरशीने खेळला गेलेल्या अंतिम सामन्यात ३८–३६ असे नमवित कबड्डी महर्षी स्व. शंकरराव साळवी चषकावर आपले नाव कोरले. पूर्वार्धात तीन अव्वल पकड करूनदेखील बँक १९–२० अशा एका गुणाने पिछाडीवर पडले होते. उत्तरार्धात मात्र बँकेने ही पिछाडी भरून काढत दोन गुणांनी सामना आपल्या नावे केला. शार्दुल पाटील, चिन्मय गुरव यांच्या चतुरस्त्र चढाया त्याला साहिल राणेने दिलेली भक्कम पकडिची भक्कम साथ यामुळे बँकेने हा विजय साकारला. आकाश गायकवाड, रोहन उके, नितीन सांगळे यांनी भारत पेट्रोलियमकडून शर्थीचे प्रयत्न केले पण संघाला विजय मिळवून देण्यात ते कमी पडले.

महिला व्यावसायिक गटात बँक ऑफ बडोदाने साई सिक्युरिटीचा दुबळा प्रतिकार ५०–१३ असा सहज मोडून काढला. पहिल्या सत्रात तीन लोण देत ३३–०३ अशी आघाडी घेत आपला विजय निश्चित केला होता. दुसऱ्या सत्रात आणखी एक लोण देत ३७ गुणांच्या मोठ्या फरकाने हा विजय साकारला. हरजित कौर, साधना विश्वकर्मा यांच्या चढाई–पकडीच्या झंझावाती खेळाला साई संघाकडे उत्तर नव्हते. साईची भगवती रावल बरी खेळली.

# एलआयसी–आयडियल कप बुद्धिबळ स्पर्धा आज रंगणार

## १३२ खेळाडूंमध्ये चुरस

**मुंबई : प्रतिनिधी**

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे बालदिनानिमित्त १४ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या एलआयसी–आयडियल कप बुद्धिबळ स्पर्धेत फिडे गुणांकित बुद्धिबळपटूसह १३२ खेळाडूंमध्ये चुरस होईल. ही स्पर्धा मुंबईच्या परळ येथील आरएमएमएस वातानुकुलित सभागृहात होणार आहे.

७, ८, ९, १०, ११, १२ वर्षाखालील मुला–मुलींच्या गटात होणारी ही स्पर्धा लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांनी पुरस्कृत केली असून आयडियल ग्रुप, आरएमएमएस व मुंबई शहर जिल्हा बुद्धिबळ संघटना सहकार्यीत स्पर्धेतील विजेत्या–उपविजेत्यांना एकूण १२० पुरस्कार दिले जाणार आहेत.

स्पर्धेचे विजेतेपद जिंकण्यासाठी वेद शाह, फेरद्यन लोबो, नारायण शर्मा, आर्य नाईक, यश टंडन, समर्थ शशांक, डेत्यन लोबो, जीयाना धरमसी, मीरा गोगरी, नचिकेत अय्यर, समर्थ वाईरकर, वरुण कृष्ण आदी उदयोन्मुख बालबुध्दिबळपटू प्रतिस्पर्ध्यांच्या राजावर विजयी हल्ले करण्याच्या पूर्ण तयारीनिशी सिध्द आहेत. विविध सहा वयोगटामधील स्विस लीग पध्दतीची प्रत्येक फेरी १५–१५ मिनिटे अधिक तीन सेकंद इन्क्रिमेंटची आहे.

# नवी मुंबईतील कराटेपटूंचे राज्यस्तरीय स्पर्धेत सुयश



**नवी मुंबई : बातमीदार**

ओकिनावा क्युडोकान कराटे डो इंडिया आयोजित सातवी राज्यस्तरीय कराटे स्पर्धा मुंबईच्या मालाड येथील मुंबई पब्लिक स्कूल या ठिकाणी झाली. या स्पर्धेत नवी मुंबई संघातील सहभागी खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली.

स्पर्धेत विविध जिल्ह्यांतून ४००पेक्षा जास्त खेळाडूंनी सहभाग नोंदवला. नवी मुंबईतून ओकिनावा शोरीन रियु क्युडोकान कराटे डो संस्थेच्या ऐरोली शाखेतील खेळाडूंनी नवी मुंबई संघाचे प्रतिनिधित्व करून नाव उंचावले. या खेळाडूंनी कुमिते आणि काता प्रकारात एकूण सहा सुवर्ण, चार रौप्य आणि पाच कांस्य अशी एकूण १५ पदके जिंकली. या वेळी विशेष पाहुणे म्हणून एनएसजी ब्लॅक कॅट कमांडो आर.पी.मिश्रा उपस्थित होते.

नवी मुंबईतील पदकविजेत्या खेळाडूंमध्ये वैष्णवी जमखंडी (दोन सुवर्ण), दुर्वा चव्हाण, हर्ष गडदरे व रिशिता अरेनकेरी (एक सुवर्ण, एक कांस्य), निव दामा (एक सुवर्ण), नेहा विश्वकर्मा (दोन रौप्य), तेजस राय व गंधार चौलकर (एक रौप्य), मनस्वी गुडूळकर (दोन कांस्य), चिन्मय चिटणीस व वेदांत फणसे (एक कांस्य) यांचा समावेश आहे. सर्व कराटेपटू ऐरोलीतील संत सावता भवनात प्रशिक्षण घेतात. त्यांना प्रशिक्षक सेंसाई प्रसाद चौलकर (मुख्य प्रशिक्षक), सेंपाय कौस्तुभ कोल्हे (सहाय्यक प्रशिक्षक) यांचे मार्गदर्शन लाभले.

शिहान अरुण बोडके (मुख्य प्रशिक्षक भारत), रेंशि विनायक सकपाळ (सहाय्यक प्रशिक्षक भारत) तसेच रेंशी अरविंद.ग.भोपी (मुख्य प्रशिक्षक रायगड) यांनी यशस्वी खेळाडूंचे कौतुक केले.

# भारतीय संघाची धमाल दिवाळी पार्टी; कुटुंबियांचीही लाभली उपस्थिती





**बंगळुरू : वृत्तसंस्था**

विश्वचषक स्पर्धेतील शेवटच्या साखळी सामन्यापूर्वी भारतीय संघाने दिवाळी उत्साहात साजरी केली. संपूर्ण संघ आपल्या कुटुंबसोबत एकत्र दिसला. ही पार्टी बंगळुरूमध्येच आयोजित करण्यात आली होतीया पार्टीचा व्हिडीओ बीसीसीआयने शेअर केला आहे.

या पार्टीला भारतीय खेळाडू आणि कर्मचारी त्यांच्या पत्नी आणि मुलांसह पोहचले होते. सर्वांनी पारंपरिक कपडे घातले होते. पुरुषांनी कुर्ता–पायजमा परिधान केला होता, तर स्त्रियांनी साडी किंवा सलवार–सूट परिधान केला होता.

या पार्टीत विवाहित खेळाडू त्यांच्या पत्नीसह आले होते. विराट कोहली आणि अनुष्का, रोहित शर्मा आणि रितिका सजदेह यांनी पार्टीला हजेरी लावली. या पार्टीत टीमचे युवा खेळाडू इशान किशन आणि शुबमन गिल खूप मस्ती करताना दिसले. शार्दुल ठाकूर आणि शुबमन गिल यांनी एकसारखे कुर्ते घातले होते. काळ्या कुर्त्यात इशान किशनही डॅशिंग दिसत होता.

या पार्टीत विराट कोहलीचा लूकही पाहण्यासारखा होता. कोहली हिरव्या रंगाचा कुर्ता, तर अनुष्काने गुलाबी रंगाचा कुर्ता घातला होता. रोहित शर्माने स्काय ब्लू कुर्ता घातला होता, तर त्याची पत्नी रितिकाही गुलाबी रंगाच्या साडीत दिसली. पांढऱ्या रंगाचा कुर्ता परिधान केलेल्या या पार्टीत सूर्यकुमार यादव डॅशिंग दिसत होता. मोहम्मद शमी आणि मोहम्मद सिराजचा लूकही पाहण्यासारखा होता.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com